॥ श्री ॥

# - मुण्डकोपनिषद् -

## - शान्तिपाठ -

8 am

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः
भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ।

9

10

स्थिरैरङ्गैस्तुष्टुवांसस्तनूभिर्व्यशेम
देवहितं यदायुः ।

11

स्वस्ति न इन्द्रो वृद्धश्रवाः
स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः ।

12

स्वस्ति नस्तार्क्ष्यो अरिष्टनेमिः
स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ॥

1 pm

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

2

3

4

5

6

7

8

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

8 am **प्रार्थना -** प्रत्येक व्यक्तीमध्ये अनेक व्यक्तिमत्वे आकार घेत असतात. एकच व्यक्ती घरामध्ये वेगळी,

9 ऑफिसमध्ये वेगळी, समाजात निराळी, परिवारामध्ये आणखीनच निराळी असते. कोणतीतरी बाजू दुबळी

10 तर कोणतीतरी अधिक सामर्थ्यशाली असू शकते. एका भूमिकेतून दुसऱ्या भूमिकेत सहजतेने

11 ये-जा करू शकते.

प्रार्थनेद्वारा आपण आपल्यातील दिव्यत्वाला

12 आवाहन करू शकतो आणि आपल्या व्यक्तिमत्वातील दोष, मर्यादा यांच्या पलीकडे जाऊ शकतो.

1 pm

2

3

4

5

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

हे उपनिषद अथर्ववेद वेदाच्या शौनक शाखेचे आहे. शरीरामध्ये मस्तक जसे महत्वाचे तसे हे महत्वाचे उपनिषद आहे. मस्तकाला मुण्डक म्हणतात, म्हणून हे मुण्डकोपनिषद हा एक अर्थ झाला.

दुसरा अर्थ असा आहे की ज्ञानसाधना करण्यापूर्वी अविद्या नाहीशी व्हावी लागते, म्हणजेच अविद्येचे मुण्डन करावे लागते. अशा अविद्येचे मुण्डन करणारे, सद्विद्येचा प्रकाश दाखवणारे हे मुण्डकोपनिषद आहे.

यात ब्रह्मविद्येविषयी विवरण केले आहे. परब्रह्म — एकोऽहं बहुस्याम् — या खेळासाठी ब्रह्मदेवाची निर्मिती केली. ब्रह्मदेव स्वयंभू - प्रगट झाले. त्याने विश्वाची रचना केली. पुत्रांना उत्पन्न केले. ब्रह्मदेवाचे ११ मानसपुत्र आहेत.

त्यातील ज्येष्ठ पुत्र अथर्वाला ब्रह्मविद्या दिली. त्याने ती अंगिला, अंगीने भारद्वाजगोत्री सत्यवहाला व सत्यवहांनी अंगिरसाला दिली.

या अंगिरसांकडे शौनक ऋषी ब्रह्मविद्या शिकण्यासाठी गेले. हे शौनक स्वतः विद्यासंपन्न, आचारसंपन्न असे आचार्य होते. आर्थिक सुस्थिती होती. धर्माचरण करत होते. त्यांच्याकडे २८००० छात्र शिकत होते. मात्र हे सर्व असूनसुद्धा त्यांना ब्रह्मविद्या जाणून घेण्याविषयी उत्सुकता होती. केवळ ब्रह्म जाणल्यानेच जीवनाचे सार्थक होते यावर त्यांची श्रद्धा होती. आणि म्हणूनच ह्या सर्वांचा त्याग करून हातात समिधा घेऊन सश्रद्ध अंतःकरणाने ते अंगिरसांकडे गेले व छात्रभावाने त्यांनी ब्रह्मविद्या जाणण्याची इच्छा प्रगट केली.

आणि प्रश्न विचारला —

© www.madhavveeraghuveer.com

8 am भगवन्, ज्या एकाला जाणल्यानंतर सर्व काही जाणले जाते त्या परमतत्त्वाला कसे जाणावे?

9 कस्मिन् नु भगवो विज्ञाते
सर्वमिदं विज्ञातं भवति? इति।

10 आणि या प्रश्नातून त्यांची (शौनक ऋषींची) जिज्ञासा व तळमळ दिसून येते.

11 आणि या प्रश्नाला दिलेले सविस्तर उत्तर म्हणजेच हे मुण्डकोपनिषद् आहे.

12

1 pm प्रार्थना - [illegible] औचित्य, स्थान

2 विभागणी - ३ मुंडक व प्रत्येकी २

१.१ - ३, ५, ६, ७

3 १.२ ४ - अग्निहोत्र[illegible]

4 २.१ - [illegible]

5 २.२ १ अग्निः, ४ प्रणवो धनुः, ८, १०

३.१ १ द्वा सुपर्णा, ६

6 ३.२ ३ नायमात्मा, ८

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

July 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

Priority ॥श्री॥

TUE JUN 8 2010

Wk 23, 159-206

## प्रथम मुण्डक - प्रथम खण्ड

8 am

ॐ ब्रह्मा देवानां प्रथमः सम्बभूव (१४ भुवने) (रक्षणकर्ता)
विश्वस्य कर्ता भुवनस्य गोप्ता।
स ब्रह्मविद्यां सर्वविद्याप्रतिष्ठाम् (आधार)
अथर्वाय ज्येष्ठपुत्राय प्राह॥१॥

10

ब्रह्मविद्या ही इतर सर्व विद्यांचा आधार आहे. सर्व विश्वाचा कर्ता व जगाचे पालन करणारा असा ब्रह्मदेव देवांमध्ये सर्वांच्याही प्रथम प्रकट झाला. त्याने सर्व विद्यांचे प्रतिष्ठान असणारी ब्रह्मविद्या आपला ज्येष्ठ पुत्र 'अथर्व' याला सांगितली.

ब्रह्म शब्द तिन्ही लिंगात वापरला जातो.

ते ब्रह्म — श्रेष्ठतम सत्तत्त्व.
तो — ब्रह्मा — जगताचा निर्माता
ती — जगज्योती

परमश्रेष्ठ अशा सत्यतत्त्वासंबंधीच्या ज्ञानाला ब्रह्मविद्या असे म्हणतात. ब्रह्माने प्रथम सांगितली म्हणून असेल किंवा सर्वांमध्ये बृहती म्हणून ब्रह्मविद्या असेल.

भगवद्गीतेत देखील पुष्पिकेमध्ये ह्या ब्रह्मविद्येचा निर्देश केला आहे. यालाच शास्त्रांचे शास्त्र, सर्व ज्ञानांचे ज्ञान किंवा सर्व शास्त्रांचे अधिष्ठान म्हटले आहे.

परब्रह्म म्हणजे ऊर्जा आहे- ज्ञान आणि क्रिया-शक्तीला असलेली शक्ती आहे. मात्र शक्तीला कोणते तरी माध्यम लागते. बीज प्रगट होण्यासाठी पखा, कमळ, क्षीर आवश्यक आहे. तसेच ही ऊर्जा प्रगट झाली ती ब्रह्मदेवाच्या माध्यमातून) हा प्रथम निर्माता आहे. तसेच तो रक्षणकर्ता आहे (गोप्ता)- १४ भुवने सप्त स्वर्ग, सप्त पाताळ.

Birthday / Anniversary

© www.madhuraveeraghuveer.com

Priority



अशा या ब्रह्मदेवाने प्रकट होताच तप केले. तेव्हा त्याला विश्वाची निर्मिती कशी करावी हे कळले.

त्यासाठी त्याने ११ मानसपुत्र निर्माण करून त्यांना विश्वाचा विस्तार करायला सांगितले.

कोणतीही विद्या गुरूकडून प्राप्त झाल्यावर सत् शिष्याला द्यावी लागते. नाहीतर परंपरा खंडित होते. म्हणून त्याने ती विद्या अथर्वाला दिली.

अथर्व म्हणजे स्थिर!

ही ब्रह्मविद्या सूक्ष्म आहे. तिचे ग्रहण करण्यासाठी मन स्थिर हवे. शीर्ष अथर्व हवे.

अथर्व हा स्थिरचित्त, शांत होता. विरक्त होता. म्हणून तो ब्रह्मविद्या ग्रहण करण्यासाठी पात्र होता.

अथर्वणे यां प्रवदेत ब्रह्माऽथर्वा तां
पुरोवाचाङ्गिरे ब्रह्मविद्याम्।
स भारद्वाजाय सत्यवहाय प्राह
भारद्वाजो ऽङ्गिरसे परावराम्॥२॥

ब्रह्मदेवाकडून प्राप्त झालेली ब्रह्मविद्या अथर्व ऋषींनी पूर्वी अंगि ऋषींना, अंगि ऋषींनी भारद्वाजपुत्र सत्यवाहाला. व सत्यवाहाने ही विद्या अंगिरसाला सांगितली.

ब्रह्मा → ब्रह्मदेव → अथर्व → अंगी →
सत्यवाह → अंगिरस

पुरा या शब्दातून प्राचीन काळ दाखवला आहे.

पुरोवाच प्रजापतिः।

परंपरेचे फार महत्त्व आहे. ती ज्या श्रेष्ठ व्यक्तींकडून पुढे पुढे जात असते. त्या सर्व श्रेष्ठ व्यक्तींच्या तपोबलाचे पुण्य बरोबर घेऊन ती विद्या परिपक्व होत असते.



©www.madhaveeraghuveer.com

अथर्व —

अथर्व ऋषींना सर्वप्रथम ही विद्या प्राप्त झाली हे अथर्व (ऋषी) इंद्राला फार प्रिय होते. लाकडावर लाकूड घासून अग्नि तयार करण्याची विद्या यांनीच शोधून काढली. त्यांनी निर्माण केलेल्या यज्ञशक्तीमुळे सवितानारायणाच्या मार्ग प्रशस्त झाला. आणि ऋग्वेदाचे कित्येक दिव्य मंत्र निर्माण झाले. आणि ४ था वेद देखील यांच्याच नावाने (अथर्ववेद) प्रसिद्ध झाला.

ही ब्रह्मविद्या ज्ञान, कर्म आणि भक्ती यांनी युक्त आहे.

असे ब्रह्मज्ञानी ऋषी जिथे निवास करतात तिथे राहणारी माणसे, पशु, पक्षी सर्वच समाधानी, आनंदी तृप्त असतात. दुराचरण त्या दिशेला फिरकतही नाही. अग्निकुंडात प्रदीप्त झालेल्या अग्नित सर्व दुर्गुण नाहीसे होतात. मनाच्या वृत्ती स्थिर होतात.

उपनिषद ऋषींना त्यांच्या ध्यानाच्या अत्यंत तरल अवस्थेत सत्यतत्त्वाचे दर्शन होई. त्या वेळी ते उन्मनी अवस्थेत असत. त्या ज्ञानाला स्वतःचे असे म्हणण्याचे धाडस ते करत नसत.

अशी अपरोक्ष अनुभूति आल्यानंतर ते त्यागी विरागी, आत्मसंयमी जीवन जगत असत. असे आचार्य जेव्हा शिष्याला मार्गदर्शन करत तेव्हा ते आपल्या आचार्यांचा कृतज्ञतेने उल्लेख करत. याप्रमाणे ईश्वर प्रणीत ग्रंथाधिकारामुळेच श्रुतींची शुद्धता राखली गेली आहे.

©www.madhuveeraghuveer.com

June 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | | | | |

मोठ्या विद्यालयाचा चालक.

8 am शौनको ह वै महाशालो
अंगिरसं विधिवदुपसन्नः पप्रच्छ ।
9 कस्मिन्नु भगवो विज्ञाते
सर्वमिदं विज्ञातं भवतीति ॥३॥

10 खरोखर मोठ्या यज्ञशाळा चालवणारे शौनक महर्षि, अंगिरस ऋषींकडे विधियुक्त पद्धतीने 11 (हातात समिधा घेऊन) विचारते झाले — हे भगवन्, काय निश्चितपणे जाणले असता हे इतर सर्व 12 जाणले जाते?

अंगिरस हे सर्वज्ञ आहेत. ते ब्रह्मविद् आहेत. 1 pm त्यांना विचारले असता आपल्या प्रश्नाचे उत्तर मिळेल, आपली तळमळ शांत होईल असा शौनकांना विश्वास 2 वाटतो. नचिकेत्याप्रमाणेच आत्म्याविषयी जाणून घेण्याची शौनकांची इच्छा आहे आणि म्हणूनच आपले वैभव, 3 गुरुकुल या सर्वांकडे पाठ फिरवून ते जिज्ञासेने अंगिरसांकडे आले आहेत.

4 असे हे शौनक ऋषी जीवनाकडे पाठ फिरवून आलेले नाहीत, तर निकोप, तळमळीचे आणि 5 संपन्न जीवन अनुभवल्यानंतर ही आंतरिक असमाधान वाटत असणारे असे परिपूर्ण व्यक्तिमत्व आहे.

6 शौनक हे परिपक्व असे आर्य सुपुत्र आहेत. त्यामुळे उपनिषदांच्या द्वारातून आत प्रवेश करण्यासाठी 7 योग्य आहेत. हे सर्व गुणविशेष महाशाल या शब्दातून सूचित झाले आहेत. श्रेष्ठ घरंदाज असा अर्थ अंतर्भूत आहे भक्तिभाव व श्रद्धा असणारा संपन्न धनिक असे वर्णन यात आहे. मालदार — मालदार — धनिक — पैसेवाला — श्रीमंत
श्रीयुक्त — श्री —

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

शिष्याने गुरुकडे विनम्रभावाने यायला हवे. आपल्या पदव्यांचा, ज्ञानाचा, श्रीमंतीचा बडिवार नको. शरणागत भाव हवा. ज्ञान संपादन करण्याची तीव्र उत्कंठा हवी. हाल-अपेष्टांचे जीवन जगण्याची, त्यांना तोंड देण्याची तयारी हवी. सेवातत्परता हवी. त्यासाठी समित्पाणि अवस्था हवी.

शुष्क काष्ठ किंवा कर्दळीच्या तोडलेल्या काड्यांची जुडी घेऊन जाण्याचा परिपाठ होता. कारण गुरूंना इतर कोणत्याही गोष्टींची गरज नसे. ते चिंतनमग्न अवस्थेत असत. अशा गुरूंच्या जवळ जाऊन शांतपणे, आदराने निःशब्द बसणे हासुद्धा सत्संगच आहे.

साक्षात्कारी पुरुष हे बासरीप्रमाणे असतात. ते आपणहून सूर काढू शकत नाहीत. आपण फुंकून त्यातून संगीत बाहेर काढायचे असते.

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया।

भक्ती ज्ञान कर्म

या मुंडकोपनिषदात छात्राने आचार्यांना एकच गहन व महान प्रश्न विचारलेला आहे.

सर्व भौतिक शास्त्रे आपल्याला मर्यादित स्वरूपाचे ज्ञान देतात परंतु ते स्वयमेव ज्ञान नव्हे. ज्यात सर्व प्रकारचे ज्ञान अंतर्भूत आहे अशा ज्ञानाची याचना शिष्य करत आहे.

महासागराचे ज्ञान झाले की आपोआपच लाटा, फेस, थेंब, बुडबुडे यांचे ज्ञान होते. शौनकांना असेच ज्ञान जाणून मिळवायचे आहे. इतर विषय वस्तूंचे ज्ञान ज्यायोगे प्रकाशित केले जाते ते आपल्या प्रज्ञेतील प्रकाशतत्त्व जाणून घ्यायचे आहे.

माती - सोने

घट - अलंकार

Birthday / Anniversary

©www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
|  | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 |  |  |  |  |

तस्मै स ह उवाच। द्वे विद्ये वेदितव्ये
इति ह स्म यद्ब्रह्मविदो वदन्ति
परा चैवापरा च ॥ ४ ॥

शौनकांना अंगिरस म्हणाले की ब्रह्मविद् असे निश्चितपणे सांगतात की दोन विद्या जाणून घ्याव्यात. एक परा व दुसरी अपरा।

खरे तर एखाद दुसऱ्या शब्दात किंवा वाक्यात याचे उत्तर देता आले असते परंतु इथे गुरु सविस्तर उत्तर देतात. तसे पाहिले तर हे उत्तर थोडे फसवे आहे. परंतु शिष्याची खरी अडचण गुरुंना समजली तर ते शिष्याला समजेपर्यंत समजावून सांगतात. बहिर्मुख अशा जगात असणाऱ्या भौतिक शास्त्राचीच आपल्याला जाण असते. आणि छात्र जिथे आहे तिथून वरच्या पायरीवर नेण्यासाठी गुरु मार्गदर्शन करतात. आणि ज्ञानाच्या दोन शाखा सांगतात — उच्च व निम्न। अलौकिक व लौकिक परंतु जे नाही आहे त्याचे खंडन करणे व जे आहे त्याचे मंडन करणे हा योग्य मार्ग आहे

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

July 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

*Priority*

8 am

तत्रापरा ऋग्वेदो यजुर्वेदः सामवेदोऽथर्ववेदः
शिक्षा कल्पो व्याकरणं निरुक्तं छन्दो ज्योतिषमिति
अथ परा यया तदक्षरमधिगम्यते ॥५॥

9

10 या अपरा विद्येमध्ये चारी वेद, त्याची षडंगे यांचा समावेश होतो व परा विद्या ही त्या अक्षर परब्रह्माची ओळख करून देते.

11

12 ऋग्वेद - होतृ    यजुर्वेद - अध्वर्यु
सामवेद - उद्गाता

1 pm

शिक्षा - उच्चारण शास्त्र Phonetics
कल्पसूत्र - कर्म व आचार यांचे नियम

2 व्याकरण - शब्द, धातू, इत्यादि    पाणिनी - अष्टाध्यायी

3 निरुक्त - व्युत्पत्ती
छंद - [illegible]
ज्योतिष - [illegible] निरीक्षण.

4

5

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghaveer.com

४ मार्च २०१०

यत् तत् अद्रेश्यम् अग्राह्यम् अगोत्रम् अवर्णम्
अचक्षुःश्रोत्रम् तत् अपाणिपादं नित्यं विभुं सर्वगतं
सुसूक्ष्मं तत् अव्ययं यत् भूतयोनिं परिपश्यन्ति धीराः ॥६

ज्या पराविद्येने ते ब्रह्म समजावून घ्यायचे ते अद्रेश्य आहे म्हणजेच इंद्रियगोचर नाही.

अग्राह्य - ग्रहण करण्यापलीकडचा.
अगोत्र - त्याला आईवडील, कुल नाही.
अवर्ण - ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र असे वर्गवारी नाही.
अचक्षुःश्रोत्रम् - आकृति, शरीर, रंग नाही. केवळ ऊर्जा आहे
अपाणिपादम् - ज्ञानेंद्रिये/ कर्मेंद्रिये नाहीत.
नित्य - सदा वर्तमान आहे. तो नाही असे कधीच नाही
विभुम - व्यापक, ब्रह्मा - सर्वात मोठा
सर्वगतम - सर्वत्र जाणारा, सर्वांमध्ये असणारा.
सुसूक्ष्म - सर्वाधिक सूक्ष्म, यापेक्षा सूक्ष्म काही नाही.
अव्यय - अविकारी, अपरिवर्तनीय, न बदलणारे.
भूतयोनि - सर्व भूतांचे जन्मकारण. (कच्चा माल)

ज्यांची बुध्दी स्थिर आहे, कुशाग्र आहे, जे चिकाटीने / दृढतेने त्या परब्रह्माचा ध्यास घेतात, त्यांना हे सर्वत्र दिसते.

वटवृक्षाचे फळ फोडले असता, त्यात सूक्ष्म कणिका दिसतात. त्या कणिका फोडल्यावर आत काहीच नसते. तरीसुध्दा त्यापासून इतका मोठा, भव्य वटवृक्ष उत्पन्न होते.

तसेच हे इतके प्रचंड विश्व दिसते आहे. त्याचे कारण आम्हाला दिसत नसले तरी असणारच. यावर 'श्रद्धा' ठेवणे एवढेच आमच्या हातात आहे.

Birthday / Anniversary

17 THU JUN 2010 Priority

Wk 24, 168-197

June 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | | | | |

8 am

यथा ऊर्णनाभिः सृजते गृह्णते च
यथा पृथिव्याम् ओषधयः सम्भवन्ति ।
यथा सतः पुरुषात् केशलोमानि
तथा अक्षरात् सम्भवन्ति इह विश्वम् ॥७॥

ते परब्रह्म एकमेवाद्वितीय आहे मग त्यापासून हे भेदयुक्त विश्व निर्माण कसे झाले?

(१) ज्याप्रमाणे कोळी आपल्याच अंगातून धागा काढतो. जाळे विणतो आणि नंतर ते आपणच गिळून टाकतो. त्याचप्रमाणे हे परब्रह्म आपल्यातूनच हे विश्व निर्माण करते व पुन्हा ते आपल्यातच विलीन करते. तुकाराम महाराज म्हणतात– "ही त्या एकाचीच वीण आहे."

कोळ्याला निदान धागा तयार करायला गति घ्यावी लागते. इथे तर तीही नाही. त्याने केवळ इच्छा केली. त्याबरोबर त्याच्यातील कार्यशक्ती जागृत होऊन कार्य घडले. Let there be light & light was there..

(२) पृथ्वीमधून नाना गुण, सुगंध, आकार, रंगांनी युक्त वनस्पती उगवतात. हिरवळ उगवते. पुन्हा हे सर्व मातीतच मिळून जाते. तसे परब्रह्मापासून हे विविधतेने नटलेले विश्व निर्माण झाले व शेवटी ते त्याच्यातच विलीन होणार आहे.

(३) चैतन्ययुक्त परब्रह्मातून जड गोष्टी कशा निर्माण होतात? खरे तर या सृष्टीत पूर्ण जड असे काहीच नाही. चैतन्याचे प्रमाण कमी-जास्त असेल कदाचित! अगदी दगडात सुद्धा मंद चैतन्य असतेच त्याशिवाय दगड सर्व बाजूंनी तापणार नाही. एका बाजूला सूर्यकिरण तापवत असताना त्याची दुसरी बाजू देखील

Birthday / Anniversary

© www.maduraveeraghuveer.com

तापते. म्हणजेच उष्णतेचे वहन सुरु असतेच त्याअर्थी काहीतरी चेतना असणारच!

ज्ञानेश्वरांनी निर्जीव भिंत चालवली असे आपण मानतो. वास्तविक मंद प्रमाणात विखुरलेल्या स्वरूपात तिथे चैतन्य होतेच. माऊलीने आपल्या योगसामर्थ्याने ते चैतन्य एकाच दिशेला वळवले व भिंत चालवली. रेड्याच्या तोंडी वेद वदवले.

आणि दुसरी गोष्ट आपल्या सर्वांच्या परिचयाची आहे. जिवंत माणसाच्या शरीरातून नखे, केस, रोम यांची निर्मिती होतेच.

त्याचप्रमाणे या अक्षर, अव्यक्त परब्रह्मापासून विश्व निर्माण होते व त्याच्यातच लय पावते. हे जग निर्माण करण्यासाठी त्याला कुठूनही सामग्री आणावी लागत नाही. कोणते श्रम करावे लागत नाहीत. नखे/केस आपोआपच वाढतात. तसेच विश्व त्याच्या ऊर्जेने आपोआप विस्तारत जाते.

उपादान कारणही तोच आणि निमित्तकारणही तोच!

इथे तीन उपमा दिल्या आहेत. त्याची कारणे –

१. कोळी आपल्या वैयक्तिक हेतुसाठी, तृप्तीसाठी जाळे निर्माण करतो. परंतु या विश्वाच्या निर्मितीमागे त्या परम सत्यतत्त्वाच्या काहीही वैयक्तिक हेतू नाही.

२. वनस्पती निर्माण करणे, त्यांचे पोषण करणे यामागे पृथ्वीचा कोणताही हेतू नसतो. कोणत्याही सायासाविना वनस्पती पृथ्वीतून उगवतात. जगत्सुद्धा तसेच सत्यतत्त्वापासून बाहेर पडत असते.

३. परंतु परमतत्त्व हे अचेतन नाही. तर मग चैतन्यातून जड कसे निर्माण होते याचे निराकरण करण्यासाठी डोक्यावरील व शरीरावरील केसांचे उदाहरण दिले आहे.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

जोपर्यंत मानव जिवंत आहे तोपर्यंत त्याच्या चैतन्याची अभिव्यक्ती म्हणून केस, रोम, नखे वाढणारच. आणि त्यामुळे व्यक्तीला कोणताही त्रास सोसावा लागत नाही. त्याचप्रमाणे हे अनित्य जग हो त्या नित्य सत्यतत्त्वाची अभिव्यक्ती आहे. यातून तीन भिन्न कल्पना समोर येतात.

अ - विश्व हे त्याच्यातून, त्याच्या स्वतः व्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही कारणाच्या मध्यस्थीशिवाय निर्माण झाले आहे.

आ. कोळी जसा सायासाने आणि हेतूने जाळे निर्माण करतो, तसा कोणताही हेतू नाही किंवा सायासही ~~[illegible]~~. परतत्त्वाच्या बाबतीत नसते. विश्वनिर्मिती ही त्याची दिव्य लीला आहे.

इ. परमतत्त्व हा मृत, अचेतन पदार्थ नाही तर सजीव चैतन्य, सच्चिदानंदस्वरूप आहे. ते सर्वव्यापी सारतत्त्व आहे.

सत् - अस्तित्व, आहेच आहे.

चित् - चैतन्यस्वरूप

आनंद - क्रियाशीलता.

Birthday / Anniversary

© www.madhavaraghuveer.com

8 am तपसा चीयते ब्रह्म ततोऽन्नमभिजायते।
अन्नात्प्राणो मनः सत्यं लोकाः कर्मसु चामृतम्॥

9 तप म्हणजे एकाग्र होऊन केलेले चिंतन।
10 ब्रह्मदेवाने ज्ञानमय तप केले तेव्हा ते स्थूल
झाले. विश्वनिर्मिती हा अपघात नाही. Big Bang
11 नाही तर ती एक निर्धारित निसर्ग योजना आहे.
विश्वाच्या पोषणासाठी अन्नाची निर्मिती झाली.
12 अन्नापासून प्राण, प्राणांपासून मन निर्माण झाले.
प्राण आणि मनाचा निकटचा संबंध आहे.
1 pm मन जेव्हा विक्षेपित होते तेव्हा प्राणाची —
श्वासोच्छ्वासाची धडधड वाढते. आणि मन जेव्हा
2 शांत, सुमनित असते तेव्हा प्राणांची गती
सुरळीत, शांत असते. जिथे प्राण नाही तिथे मन
3 असू शकणार नाही.
मनामध्ये संकल्प-विकल्प, संशय, विचार-विकार
4 निर्माण झाले. त्यातून पंचमहाभूतांचा विचार पुढे आला.
हे व्यावहारिक सत्य आहे. त्यातून कर्म आणि कर्मफळांची
5 निर्मिती होते आणि ही साखळी जन्मानुजन्म टिकून राहते.
केवळ भोगूनच संपवता येते. म्हणून ते सत्यही आहे
6 आणि अमृतही आहे. — [कर्मफळे]
पंचमहाभूतांपासून [लोक्यन्ते इति लोकाः]
7 जे दिसते, अनुभवले जाते असे विश्व निर्माण झाले.
म्हणजेच विविध वस्तू, प्राणी, जीव-जंतू, मानव निर्माण
झाले. त्यांच्या बरोबरच त्यांची कर्मे उत्पन्न झाली.
प्रत्येक कर्म आपले फळ घेऊनच येते. ते भोगूनच सरते.
ते नाहीसे होत नाही तर कालांतराने भोगावे लागते. म्हणून
त्याला अमृत म्हटले आहे.

Birthday / Anniversary

©www.madhaveeraghuveer.com

यः सर्वज्ञः सर्वविद्यस्य ज्ञानमयं तपः।
तस्मात् एतत् ब्रह्म नाम रूपमन्नं च जायते॥९॥

अक्षर, अव्यय, निर्गुण निराकार ब्रह्म सच्चिदानंद स्वरूप असल्याने ते सर्व जाणणारे आहे. त्या अक्षरब्रह्मापासून विश्व उत्पन्न करणारा ब्रह्मदेव निर्माण झाला. त्यापासून ही नामरूपात्मक सृष्टी निर्माण झाली. तिच्या पोषणासाठी अन्न निर्माण झाले. त्या परब्रह्मापासूनच सर्व निर्माण झाले असल्याने त्याला जाणले की सर्व जाणल्यासारखेच आहे. — पहिल्या प्रश्नाचे उत्तर येथे मिळते.
∴ साक्षात्कारी संत कोणत्याही प्रश्नांची उत्तरे देऊ शकतात.

नामरूपात्मक – प्रत्येक गोष्टीला काही नाव असते. काही आकार असतो.

आकाशाचा गुण जो शब्द आधी निर्माण झाला. ध्वनीतून आकार निर्माण होतो. विज्ञानाने सिद्ध झाले. आधी नाम व नंतर आकार हा निर्मितीचा नियम आहे. नाम हे सूक्ष्म असते. निर्माण होणारी वस्तू कशी तयार होणार याचे ते बीज असते. वस्तू स्थूल असतो. म्हणून तर भक्तीमध्ये नामाला फार महत्त्व आहे. नाम व नामी एकच असतात.

या जगातील प्रत्येक गोष्ट अन्न आहे व प्रत्येकजण अन्न आहे.

जमिनीतील अन्न खाऊन गवत वाढते. त्या गवतावर शेळी वाढते. ती शेळी खाणारा वाघ, त्या वाघाला मारणारा शिकारी व त्या शिकाऱ्याच्या मृतदेहावर अनेक किडे मुंग्यांची गुजराण होत असते.



© www.madhaveeraghuveer.com

॥ श्री ॥

प्रथम मुण्डक - द्वितीय खण्ड

तदेतत्सत्यं मन्त्रेषु कर्माणि कवयो
यान्यपश्यंस्तानि त्रेतायां बहुधा सन्ततानि ।
तान्याचरथ नियतं सत्यकामा
एष वः पन्थाः सुकृतस्य लोके ॥१॥

मंत्रद्रष्टे असे बुद्धिमान ऋषी वेदमंत्रामध्ये जी जी कर्मे पाहते झाले, ती ती खरी आहेत. त्रेता युगात (वेदकाळात) ती विविध प्रकारे आचरली जात. सत्याची इच्छा करणाऱ्या तुम्ही (देखील) ती नेहमी निष्ठेने आचरा. या जगात शुभ कर्मफळे प्राप्त करून घेण्याचा तुमचा मार्ग आहे.

महर्षींच्या मुखातून पूर्ण ब्रह्माचे ज्ञान ऐकता ऐकता शौनक सुखावला. अंगिरसासारखा गुरु आपल्याला मिळाल्यामुळे कदाचित आपल्यालाही सर्वज्ञान होईल अशी त्याची मनोमन खात्री झाली. आणि नम्रभावाने त्याने आचार्यांना प्रश्न विचारला - "परब्रह्माविषयी केवळ ऐकूनही मन थक्क होते. त्याच्या उदात्ततेने भारावून जाते. परंतु माझ्या सारख्या सामान्याला त्याचा अनुभव कसा घेता येईल?" शिष्याचा हा प्रश्न ऐकून गुरु प्रसन्न झाले. ते म्हणाले — "ब्रह्मज्ञानाचा अनुभव परमेश्वरकृपेशिवाय कुणालाही येत नाही. शेतामध्ये रात्रंदिवस घाम गाळल्यावर परमेश्वर कृपेने पाऊस पडला तरच पीक चांगले येते."

शांत, निरागी आणि समाधानी होण्यासाठी लहानपणापासूनच शिस्त हवी. विद्याभ्यास, उद्योग आणि संयमी जीवन हवे. त्याचप्रमाणे विद्या शिकण्यासाठी पात्रता हवी.

परब्रह्माची मायाशक्ती जी सृष्टी निर्माण करते तिला संसार म्हणतात. शास्त्रे जरी या संसाराला असार

© www.madhaveeraghuveer.com

| June 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | | | | |

म्हणत असली तरी त्याच्याच आधारे जीवाचा उद्धार होतो. संसारात शुद्ध बुद्धी, निश्चल चित्त, व सदाचारी देह ठेवणारे संसारी सिद्ध पुरुष होतात थोडक्यात विहित कर्माचे निष्ठेने आचरण करणे हेच व्रत आहे, आणि तोच धर्मही आहे.

निष्ठापूर्वक कर्तव्यकर्म करणाऱ्यांच्या सर्व इच्छा पूर्ण होतात. जे पेरावे तेच उगवते. सत्कर्मातूनच सत्य प्राप्त होते.

त्रेतायाम् - याचा अर्थ त्रेतायुगात असा होऊ शकतो. तसेच तीन वेदांमध्ये असाही अर्थ होऊ शकतो. साधकाने सुरुवातीच्या टप्प्यात कर्मविधि दक्षपूर्वक आचरावेत असे सांगितले आहे. कर्मविधि सातत्याने - ज्ञानपूर्वक - नेमाने आणि उल्हसितपणे करण्यावर, यात भर दिला आहे. केवळ परिपाठ म्हणून आचरलेली कर्मे मात्र सामर्थ्य गमावून बसतात.

त्या अदृश्य शक्तीला जाणण्याचा प्रयत्न करताना यज्ञ - दान - तप हा मार्ग द्रष्टे ऋषी सांगतात.

यज्ञ - दान - तप ही कर्मे माणसाला पशुस्तरावरून उन्नत वरच्या स्तरावर नेतात. इथून मनुष्य देवत्वाकडे प्रगति करतो. पूर्वी लोक श्रद्धेने यज्ञ - याग करत असत.

कृतयुग - तपाला महत्त्व - अरण्ये अधिक.
त्रेतायुग :- यज्ञयागाला महत्त्व.
द्वापारयुग - दानाला महत्त्व
कलियुग - जीवन कृत्रिम झाले. मात्र भक्तीला महत्त्व

प्रत्येक युगातील माणसाला त्याचे विहितकार्य सांगितले आहे.

सुयोग्य समाजव्यवस्थेसाठी वर्णाश्रम सांगितले आहेत. नियत कर्म न केल्यास दोष लागतो.


Birthday / Anniversary

विहित कर्म हाच सत्कर्माचा, पुरुषार्थ प्राप्त करून देणारा सत्यमार्ग आहे.

यदा लेलायते हि अर्चिः समिद्धे हव्यवाहने ।
तदा आज्यभागौ अन्तरेण आहुतीः प्रतिपादयेत् ॥२॥

आहुतीच्या देवतांच्या जवळ पोहोचणारा अग्नी प्रज्वलित झाल्यावर जेव्हा ज्वाला भडकू लागतात तेव्हा (यज्ञकर्त्याने) दोन आज्यभागांच्या आहुतींच्या मधल्या भागात श्रद्धायुक्त अंतःकरणाने आहुती अर्पण कराव्यात.

पवित्र अग्निच्या ज्वाला जेव्हा धुरकट व अंधुक असतात तेव्हा आहुति देऊ नयेत. ज्वाला जेव्हा प्रखरपणे भडकून उठतात तेव्हाच आहुति टाकाव्यात. शिवाय उजव्या बाजूला वरच्या कोपऱ्यात आणि खालच्या कोपऱ्यात जिथे तूप सोडतात त्या दोन बिंदूच्या मधल्या जागेत आहुति टाकाव्यात. या जागेला 'अवस्थापनम्' म्हणतात.
'अवापस्थानम्'




यज्ञासाठी योग्य भूमी — योग्य कुंड — अग्निचे आधान — प्रज्वलित अग्नि (समिधा)
ज्वाला उफाळल्या पाहिजेत. — जीवनात जिवंतपणा हवा.
प्रत्येक यज्ञाला एक उपस्तरण (अस्तर) व पिधान हवे.

भोजन हा जर यज्ञ मानला तर भोजनापूर्वी पोटातील वैश्वानराला आहुती दिली जाते. म्हणजे पाण्याचे आचमन करावे. आणि शेवटी भोजन संपताना पुन्हा आचमन करावे (अमृताचे पिधान)

यज्ञात काय किंवा जीवनात काय नेहमी सावध व नियंत्रित असावे याचे हे शिक्षण आहे.

विहित कर्म नेहमीच चोख, नियमित, यथाशक्ति, भक्तिभावाने आणि निष्ठेने करावे.

Birthday / Anniversary

गृहस्थाच्या घरी अग्निहोत्र असावे.

© www.madhaveeraghuveer.com

FRI 25 JUN 2010
Priority
Wk 25, 176-189

| June 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | | | | |

8 am

यस्याग्निहोत्रमदर्शपौर्णमासम
चातुर्मास्यमनाग्रयणमतिथिवर्जितं च।
अहुतमवैश्वदेवमविधिना हुतमा
सप्तमांस्तस्य लोकान् हिनस्ति॥ ३॥

10

अग्निहोत्र करणाऱ्याचे अग्निहोत्र जर अमावस्या, पौर्णिमा चातुर्मास आणि आग्रयण अशा यज्ञाविरहित किंवा अतिथिविरहित असेल आणि ते आहुतिविरहित, वैश्वदेवाविरहित वा विधिपूर्वक केलेले नसेल तर त्याचे सातपर्यंतचे लोक नाश पावतात.

[किंवा सात पिढ्या — मागच्या तीन, आताची एक आणि पुढच्या तीन]

यात आचार्य विधि-निषेधामधील लहान-मोठ्या गोष्टींकडे आपले लक्ष वेधतात.

अग्नीची सेवाही महत्वाची मानली जाते. अग्नी हा सजाचा प्रतिनिधी व प्रत्यक्ष जीवनात अत्यंत उपकारक आहे.

अग्नीशिवाय कुठलेही कार्य संपन्न होत नाही. अग्नी स्वतः देव तर आहेच. शिवाय अन्य देव व मानव यांच्यातील तो दुवा आहे.

अग्नी तीन प्रकारचे असतात.
गार्हपत्य, दक्षिणाग्नी, आहवनीय.

१. गार्हपत्य अग्नी हा साक्षात गृहपतीच आहे. हा अग्नी घराला समृद्धी देतो. सुख, स्वास्थ्य, संतती देतो. देवांसाठी हविरन्न याच अग्नीवर तयार केले जाते. याचे कुंड गोल असते.

२. पूर्वेला आहवनीय अग्नीत यज्ञातील आहुती देतात.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

३. गार्हपत्याच्या दक्षिणेला दक्षिणाग्नी असतो. याचे कुंड (आयतन) चंद्राकार असते. पितरांसाठी दिल्या जाणाऱ्या आहुती या अग्नीत देतात. याला अन्वाहार्यपचन असेही नाव आहे.

अग्नीची सेवा करणे म्हणजे अग्निहोत्र चालवणे. रोज सकाळ संध्याकाळ होम केला जातो. या अग्नीत आहुती दिल्या जातात. हे अग्नी कधीही विझू द्यायचे नाहीत. विझल्यास प्रायश्चित्त घ्यावे लागते व इष्टि करावी लागते.

यज्ञातील अग्नी विशेषतः गार्हपत्य अग्नि अरणीचे मंथन करून उत्पन्न करतात. व नंतर तो गार्हपत्य आयतनात ठेवतात. याला अग्न्याधान असे म्हणतात. हा अधिकार गृहपतीचा असतो.

गोमयाने सारवलेली, मंत्रोच्चारांनी पावन झालेली, अतिथि-सत्काराने कृतार्थ झालेली ही अग्निशाला गृहपतींचा जणू प्राणच असते.

प्रत्येक अमावस्येला केल्या जाणाऱ्या इष्टिला 'दर्श' असे म्हणतात. पौर्णिमेला केल्या जाणाऱ्या इष्टिला 'पूर्णमास' म्हणतात. चार महिने चालणाऱ्या यज्ञाला चातुर्मास्य म्हणतात. शरद व वसंत ऋतूत येणारे नवीन अन्न प्रथम अग्नीला अर्पण करायचे असते. तो आग्रयण यज्ञ असतो. [पुत्रकामेष्टि] गृहस्थाने हे सर्व यज्ञ करावेत. विद्वान, तपोनिष्ठ अतिथीचा सत्कार करावा. वेळच्या वेळी अग्नीत आहुती द्याव्यात. दररोज वैश्वदेव विधिपूर्वक करावा.

यज्ञामुळे मनुष्य निरहंकारी होतो; निःस्वार्थ, उदार, दक्ष आणि संयमी होतो. बुद्धीचे तेज वाढते आणि विकारांचे बळ कमी होते. वृत्ती आपोआप विरक्त होऊ लागतात. म्हणून निष्ठापूर्वक अग्निहोत्र सांभाळावे.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

27 SUN JUN 2010

Wk 25, 178-187

Priority

| June 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | | | | |

काली कराली च मनोजवा च
सुलोहिता या च सुधूम्रवर्णा।
स्फुलिंगिनी विश्वरुची च देवी
लेलायमाना इति सप्तजिह्वाः॥४॥

अग्नि हे देवतांचे मुख आहे. आहुती घेण्यासाठी त्याच्या सात जिभा लपलपत असतात.

काली - काळसर
कराली - उग्र, भयावह
मनोजवा - मनाप्रमाणे चंचल
सुलोहिता - चांगली लालेलाल

सुधूम्रवर्णा - धुराच्या रंगाची
स्फुलिंगिनी - ठिणग्या बाहेर टाकणारी
विश्वरुचि - सर्व बाजूंनी प्रज्वलित

अग्नीच्या ज्वाळा जेव्हा चांगल्या रीतीने उफाळलेल्या असतात तेव्हाच त्यात आहुती द्याव्यात. म्हणजेच दिलेली आहुती (सामग्री) - समिधा, दूर्वा, भात, लाह्या, तीळ, जव - व्यवस्थित जळेल व योग्य त्या देवतांपर्यंत पोहोचेल. जेव्हा अग्नि नीट पेटला नसेल, धुमसत असेल तेव्हा त्या आहुती तिथेच राहतील व देवतांपर्यंत पोहोचणार नाहीत.

पदार्थविज्ञान शास्त्रातही अग्नीच्या ज्योतीचे वर्गीकरण व त्याचा अभ्यास केला जातो. परंतु आमचे ऋषी शास्त्रीय दृष्टीने तो विषय कसा हाताळत असत याचे हे उत्तम उदाहरण आहे.

- काली - काळावरही आपला ठसा उमटवणारी
- कराली - उदारतेची द्योतक आहे. उग्र व रौद्र आहे.
- मनोजवा - क्रियाशील - आळस, गबाळेपणा, शिथिलता दूर होते
- सुलोहिता - भक्ती व प्रीतीचे तेजस्वी तेज.
- सुधूम्रवर्णा - संसार योग्य तऱ्हेने सांभाळणारी.
- विश्वरुपी / रुचि - द्वेष मत्सर यांचा स्पर्शही नाही.

Birthday / Anniversary

©www.madhavraghuveer.com

एतेषु यश्चरते भ्राजमानेषु यथाकालं चाहुतयो ह्याददायन्। तं नयन्ति एताः सूर्यस्य रश्मयो। यत्र देवानां पतिरेकोऽधिवासः

जो या धगधगत्या ज्वाळांमध्ये योग्य वेळी आहुती देतो, त्याला या ज्वाळा सूर्याचे किरण होऊन जिथे देवांचा अधिपति इंद्र राहतो तिथे (स्वर्गात) पोहोचवतात.

एखाद्याने विहित यज्ञकर्म करताना सर्व नियमांचे पालन केले असेल तेव्हा देहपातानंतर त्याचा ~~मार्ग~~ यज्ञकर्माच्या आणि त्याच्या फलप्राप्तीच्या अनुभव क्षेत्राकडे पोहोचवण्यास अग्निदूत होईल.

ही भाकडकथा नव्हे. हे विज्ञानाने सिद्ध झाले आहे. सूर्य हा केवळ स्वयंप्रकाशी तप्त गोल नाही. तो या भूगोलावरील जीवनाचा नियंत्रक आहे.

खरोखरच यज्ञात दिलेल्या आहुती सूर्यकिरणांच्या रूपात यज्ञकर्त्याला योग्य ठिकाणी नेऊन पोहोचवतात. तीच आहुती देवांपर्यंत घेऊन जाते.

प्रत्येक इंद्रियाला त्याची त्याची देवता असते.

प्रा. एस्. के. गुप्ता यांच्या वेदवाणी या ग्रंथात 'देव' किंवा देवता या शब्दाचे सात अर्थ दिले आहेत.

१. जो चकाकतो, प्रकाश देतो.
२. जो संपत्ती देतो.
३. जो आरोग्य देतो.
४. जो मार्ग दाखवतो.
५. जो दुसऱ्यांना प्रकाशमान करतो.
६. जो संगीत ध्वनीत करतो.
७. जो ज्ञान आणि विज्ञान देतो.

मनाची देवता इंद्र आहे. मन हे इंद्रियांचा राजा व इंद्र हा देवांचा राजा आहे.

© www.madhaveeraghuveer.com

Birthday / Anniversary

आग्नि हा द्युलोकातील सूर्याचे भूमीवरील प्रतीक/रूप आहे. तो सूर्याचा भौम प्रतिनिधि आहे त्यामुळे या अग्निज्वाळा म्हणजे सूर्याची किरणेच आहेत.

श्वेताश्वतर उपनिषदात सूर्याची किरणे माणसाला कशी ऊर्जा पुरवतात याचे वर्णन आले आहे.

गृहस्थाने गृह अग्नी प्रदीप्त ठेवून त्याला यथाविधि आणि यथाकाल आहुती द्यावी. ही आहुती धान्याची/तुपाची द्यायची असते. त्याचेकाही तो सत्कर्मांची द्यायची असते. अशा आहुतीमुळे इंद्र प्रसन्न होऊन त्या घरात वास करतो.

एहि एहि इति तम् आहुतयः सुवर्चसः
सूर्यस्य रश्मिभिः यजमानं वहन्ति।
प्रियां वाचम् अभिवदन्त्यः अर्चयन्त्यः
एषः वः पुण्यः सुकृतो ब्रह्मलोकः॥ ६॥

This way please

देदीप्यमान अशा त्या आहुत्या यज्ञकर्त्या यजमानाला 'या या' असे म्हणत सूर्यकिरणांच्या द्वारे स्वर्गात घेऊन जातात. आणि तुमच्या सत्कृत्याचे व पुण्यकर्माचे फल असा हा ब्रह्मलोक आहे असे मधुर वाणीने म्हणून त्याची स्तुती करतात.

विहित कर्माचे अनुष्ठान जे आनंदाने स्वीकारतात आणि समजूतदारपणे निभावतात. त्यांना त्यांच्या सुकृताच्या योगाने सर्व सुखोपभोग प्राप्त होऊन परलोकातही उत्तम गती प्राप्त होते.

या सर्वात्मका ईश्वरा। स्वकर्म कुसुमांची वीरा।
पूजा केली होये अपारा। तोषालागी॥

Birthday / Anniversary

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

अगा जया जे विहित । ते ईश्वराचे मनोगत ।
म्हणोनि केली निभ्रांत । सापडेचि तो ॥ १८.९११

विहित कर्म म्हणजे स्वतःच्या आवडीनुसार, प्रवृत्तीनुसार निवडलेले कर्म । जे काम स्वतःच्या मनाला पटत नाही ते केवळ 'वाणिज्य कर्म' ठरते.

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
नियतं कुरु कर्म त्वम् ॥

आपल्या नियत कर्मालाच परमेश्वर समजून कर्म करावे. गोरा कुंभार, नरहरी सोनार, सेना न्हावी या सर्वांनी कर्मातच विठ्ठल पाहिला. सावता माळी
कांदा मुळा भाजी । अवघी विठाई माझी ॥
जनाबाई बरोबर तो दळण-कांडण करू लागला
धुणी धुवू लागला. कबीराचे शेले विणू लागला.
फुटक्या होड्यात.

प्लवा हि एते अदृढा यज्ञरूपा
अष्टादशोक्तम् अवरं येषु कर्म ।
एतत् श्रेयो येऽभिनन्दन्ति मूढा
जरामृत्युं ते पुनरेव अपि यान्ति ॥ ७ ॥

मागील सहा मंत्रात यज्ञाग्नी आहुती, अग्निहोत्राचे महत्त्व सांगितले आहे. ह्या आहुती स्वर्गलोकी घेऊन जातात हे जरी खरे असले तरी माणसाचे ध्येय त्यापेक्षा श्रेष्ठ असावे. सामान्यतः यज्ञ हे सकाम आहेत. ते इच्छित फल देतात. परंतु परतीरावर घेऊन जात नाहीत.
कामनापूर्तीसाठी जे यज्ञ सांगितले आहेत ते उच्च श्रेणीचे नाहीत. खालच्या श्रेणीचे आहेत.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

आणि म्हणूनच हे सकाम यज्ञ फुटक्या होडीप्रमाणे आहेत असे प्रतिपादन यात केले आहे.

यज्ञ करण्यासाठी किमान १८ जण लागतात.
ऋग्वेद — होता, मैत्रावरुण, अच्छावाक, ग्रावस्तुत।
सामवेद — उद्गाता, प्रस्तोता, प्रतिहर्ता, सुब्रह्मण्य
यजुर्वेद — अध्वर्यु, प्रतिप्रस्थाता, नेष्टा, उन्नेता.
अथर्ववेद — ब्रह्मा, ब्राह्मणाच्छंसिन, आग्नीध्र, पोता.

यजुर्वेद हा विशेषत्वाने यज्ञविधिबद्दल आहे. त्यामुळे त्याच्या प्रमुख ऋत्विजाला म्हणजेच अध्वर्युला यज्ञाचे मन म्हटले आहे व इतर सर्व त्याच्या आदेशानुसार कार्य करतात.
होता हा देवतांचे हवन करतो.
उद्गाता - सामगायन करून देवतांना प्रसन्न करतो.
ब्रह्मा - या सर्वांवर देखरेख ठेवतो. यज्ञात काही दोष राहिल्यास त्याची जबाबदारी ब्रह्मावर असते. म्हणून हे पद स्वीकारायला कुणी उत्सुक नसते.
असे हे १६ ऋत्विज, यजमान व यजमान पत्नी असे १८ जण यज्ञ करतात.

निसर्गातील शक्तींना प्रसन्न करून त्यांना कृतज्ञतेने श्रद्धेने काही अर्पण करणे ही खरी तर यज्ञामागची कल्पना आहे. सृष्टीकडून आपण जे काही घेतो त्यामुळे सृष्टीची झीज होते. ही झीज भरून काढावी असा द्रष्ट्या ऋषींचा उदात्त विचार होता. पुढे देवतांना तृप्त करणे त्यासाठी माध्यम म्हणून अग्नीला हवी देणे ही कल्पना आली.

याच यज्ञाचे आणखी सूक्ष्म रूप म्हणजे नामयज्ञ, जपयज्ञ, वाग्यज्ञ: जीवन हाच एक यज्ञ

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

8 am आहे. यज्ञस्वरूप हे जीवन होता।
केवळ गीता गाता गाता॥
9 निःस्वार्थीपणे परोपकारासाठी केलेले कोणतेही काम
म्हणजे खरे तर यज्ञच आहे.
10 यज्ञायाचरतः कर्म समग्रं प्रविलीयते।

11 हे सर्व जरी खरे असले तरी पुढे पुढे यज्ञातील
मूळ भाव हरवत गेला आणि केवळ कर्मकांडच उरले,
12 अशा कर्मकांडाने ऐहिक समृद्धी मिळेल परंतु परब्रह्माची
प्राप्ती, आत्मज्ञान होणार नाही. म्हणून फुटक्या होड्या!
1 pm परंतु त्यातील दोष काढून टाकून (सकाम)
कृतज्ञता व विश्वमांगल्याची भावना, श्रद्धा, समर्पण
2 या ~~[illegible]~~ जर यज्ञामध्ये अंतर्भूत असतील तर यज्ञ
शुभभावना हे देखील मोक्षाप्रत नेणारे साधन ठरेल.
3 या मंत्रातील शेवटच्या चरणात आलेला जरा-मृत्युच्या
उल्लेखातून पाचही विकार सूचित केले आहे.
4 जन्म मृत्यु जरा व्याधि दुःख दोषानुदर्शनम्।
आई — मुलगा — अभ्यास — पेढा.
5 आंब्याची छाया शीतल असते. परंतु त्याचे मोल
आम्रवृक्ष म्हणूनच असते.
6 स्वर्ग सुखाच्या इच्छेने चित्तशुद्धी काही होत नाही.
उलट कधी कधी अहंकार बळावतो. आणि त्यात
7 संयम, विनय हे गुण नाहीसे होतात आणि
कोरडेपणा वाढतो.
म्हणून अशा फुटक्या होडीत बसून भवपार
कसे जाता येईल?

© www.madhavearaghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

अविद्यायामन्तरे वर्तमानाः स्वयं धीराः पण्डितं मन्यमानाः ।
जङ्घन्यमानाः परियन्ति मूढा अन्धेनैव नीयमाना यथान्धाः ।।

अज्ञानातच राहून आनंद मानणारे परंतु स्वतःला ज्ञानी व पंडित मानणारे असे लोक (इतरांची दिशाभूल करतात.) अंधांकडून नेल्या जाणाऱ्या अंधांसारखे जुलूम सहन करत दीनवाणे, गोल गोल फिरत राहतात.

हाच मंत्र बृहदारण्यक उपनिषदात तसेच कठोपनिषदात (१.२.५) आला आहे.

वेद हे शाश्वत ज्ञान असल्याने आणि उपनिषदे ही वेदांतर्गत असल्याने त्यात कोणतीही विसंगती नाही. क्वचित कुठेतरी आपल्याला विसंगती वाटू शकते परंतु ती आपल्या आकलनशक्तीमधील उणीव आहे.

वेद कर्मकांड विभागात कर्माच्या संपन्नतेचे प्रांजळ समर्थन करतात. परंतु नंतरच्या काही भागात त्याची उघड निंदा केल्यासारखी वाटते. त्यामुळे सामान्यांचा गोंधळ उडतो.

प्राथमिक वर्गात शिकणाऱ्या मुलाने पाढे पाठ करून ते रोज म्हणावेत अशी सक्ती पालकांनी करणे योग्यच ठरेल परंतु तो इंजिनियरिंग शिकत असताना हाच आग्रह चुकीचा ठरू शकतो.

जी कर्मे साधकावस्थेच्या प्राथमिक अवस्थेमध्ये करायला हवीत, त्याच कर्मांचा पुढच्या उच्चतर अवस्थेत आग्रह करणे गैर आहे.

त्याचप्रमाणे यज्ञातील सकामता काढून टाकून त्याचा आध्यात्मिक अर्थ जाणून घेणे ही उच्चतर अवस्था होय.

मात्र ज्यांच्या मनात विषयासक्ती आहे ते कितीही शिकले तरी अज्ञानीच राहतात.

अविद्यायां बहुधा वर्तमाना वयं कृतार्था
इति अभिमन्यन्ति बालाः।
यत् कर्मिणो न प्रवेदयन्ति रागात्
तेन आतुराः क्षीणलोकाः च्यवन्ते ॥९॥

अविद्येत (उपासनारहित सकाम कर्मात) राहणारे असे हे पुष्कळसे अल्पमती लोक, आपण सर्व काही प्राप्त केले आहे असा अभिमान धरतात. जे कर्मठ कामासक्तीमुळे त्याच्यासाठीच आतुर असतात ते खरे ज्ञान प्राप्त करू शकत नाहीत, आणि कर्मफळांचा उपभोग संपल्याबरोबर पतन पावतात.

मागील मंत्रावर जोर दिला आहे. आपल्या नियोजना-प्रमाणे मूल जीवनात यशस्वी न ठरल्यास माता जशी रागवेल तसा हा श्रुतींचा राग आहे. तो मार्ग चुकल्यामुळे रानावनात वणवण फिरत आहे हे तिला पहावत नाही.

जेव्हा कामना समूळ नाश पावतात तेव्हा 'मनोनाश' शक्य आहे. म्हणूनच हे सर्व पंडित, विद्वान – शहाणे, उत्साही आस्थेवाईक आणि प्रांजळ मनाचे असूनही कर्मकांडात रंगून पडतात, त्याचा पाठपुरावा करतात त्यातून कामनेची बीजे अंतःकरणात पोसली जात असतात. अशा बालबुद्धी लोकांना स्वर्गप्राप्ति म्हणजे आयुष्याची इतिकर्तव्यता वाटते. या पलीकडे श्रेयसाचा मार्ग आहे हे त्यांना ठाऊक नाही आणि जाणून घेण्याची इच्छा पण नाही. त्यामुळे हे दुबळे जीव यज्ञयाग करून स्वर्गात जातात आणि पुण्याचा साठा संपला की पुन्हा मर्त्यलोकात येतात.

अहंकार आणि विषयासक्ती माणसाला सुखसुद्धा उपभोगू देत नाही.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

| July 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

इष्टापूर्तं मन्यमाना वरिष्ठं नान्यच्छ्रेयो वेदयन्ते प्रमूढाः।
नाकस्य पृष्ठे ते सुकृतेऽनुभूत्वेमं लोकं हीनतरं वा विशन्ति

इष्ट म्हणजे छोटे मोठे यज्ञ आणि आपूर्त - समाजोपयोगी कामे. हवे ते विषयोपभोग मिळाले नाही तर भोगावर दृष्टी ठेवून ही विषयासक्त माणसे धर्मकृत्ये करत राहतात. इतर समाजोपयोगी कामेही करतात. अन्नछत्र घालतात. विहिरी बांधतात.

परंतु हे सर्व करत असताना त्याला स्वतःच्या कामनांची जोड दिली गेल्याने त्याचे श्रेय वाया जाते.

शौनकाच्या मनात शंका आली. की ईश्वर शास्त्राने दिलेल्या आज्ञा आहेत. तेव्हा आता गृहस्थाने नक्की काय करावे?

गुरूंनी जी उपेक्षा दाखवली ती इष्टापूर्त कर्माविषयी नाही. ही कर्मे हितकारकच आहेत. पण त्यामागचा हेतू शुद्ध हवा. ज्या कर्मांने विरक्ती वाढायला हवी त्याच कर्मात जर आसक्ती वाढली तर कसे होणार?

भिकाऱ्यांच्या तोंडावर भाकरतुकडा फेकणे हे काही खरे दान नव्हे.

परंतु भक्तीच्या ठिकाणी भोगासक्ती ठेवली तर अहंकार वाढतो. त्यामुळे उद्धार होण्याऐवजी अधःपतन होते.

Birthday / Anniversary

तपःश्रद्धे ये ह्युपवसन्ति अरण्ये शान्ता
विद्वांसो भैक्ष्यचर्यां चरन्तः।
सूर्यद्वारेण ते विरजाःप्रयान्ति
यत्रामृतः स पुरुषो ह्यव्ययात्मा ॥११॥

कर्मकांडाने ऐहिक वा पारलौकिक भोग मिळवणे हे खरे ध्येय नव्हे. ही अविद्या आहे. मग खरी विद्या कोणती? ती कशी मिळवायची हे इथे सांगितले आहे.

जे लोक अरण्यात राहून तप आणि श्रद्धा आचरतात. ज्यांनी आपल्या इंद्रियांचे दमन करून शांतचित्तता प्राप्त करून घेतली आहे. जे विद्वान आहेत. जे भिक्षाचरण आचरतात. विरजाः – ज्यांची मागली/वाईट कर्मे भस्मसात झाली आहेत व जे विकाररहित (रजोगुणरहित) झाले आहेत. असे ते अमृत व अविनाशी पुरुषाच्या ठिकाणी सूर्याच्या मार्गाने जातात.

कर्मकांडाचे जे गुलाम झाले आहेत त्यापेक्षा हे संन्यासी कसे वैभवशाली आहेत हे या मंत्रातून स्पष्ट केले आहे. कर्मकांड्यांना अल्पकालीन आनंद मिळतो परंतु अशा धार्मिक यतींना उपनिषदे परिपूर्ण यशाचे अभिवचन देतात.

© www.mahaveeraghuveer.com

Birthday / Anniversary

7 WED JUL 2010

Priority

Wk 27, 188-177

July 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

8 am

परीक्ष्य लोकान्कर्मचितान्ब्राह्मणो
निर्वेदमायान्नास्त्यकृतः कृतेन।
9
तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत्
समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम्॥१२॥

10

ब्रह्मजिज्ञासु ब्राह्मणाने आपल्या कर्मानुसार प्राप्त झालेल्या लोकांचा निरीक्षणपूर्वक उपभोग घेतल्यानंतर जे अकृत म्हणजे शाश्वत आहे ते काही नुसते कर्म करून मिळण्यासारखे नाही, असे जाणून कामनांपासून मुक्त होण्याचा प्रयत्न करावा आणि नंतर ज्ञान मिळवण्यासाठी हातात समिधा घेऊन, श्रोत्रिय (वेदपारंगत) आणि ब्रह्मनिष्ठ अशा गुरुकडे जावे.

12

1 pm

2

3

4

5

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

August 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

*Priority*

THU JUL 8 2010

Wk 27, 189-176

8 am तस्मै स विद्वानुपसन्नाय सम्यक्
प्रशान्तचित्ताय शमान्विताय।
9 येनाक्षरं पुरुषं वेद सत्यं
प्रोवाच तां तत्त्वतो ब्रह्मविद्याम्॥१३॥

10 ज्याचे मन चांगले शांत झाले आहे अशाला – प्रशान्तचित्ताय
11 ज्याने आपल्या इंद्रियांचे योग्य दमन केले आहे – शमान्विताय.
जो यथाशास्त्र समीप आला आहे – सम्यक् उपसन्नाय.
12 अशा साधकाला विद्वान गुरुने – ज्यायोगे त्या सत्य
अविनाशी पुरुषाला जाणले जाते – त्या विद्येला
1 pm बरोबर तत्त्वविवेचनपूर्वक शिकवावे.

2

3

4

5

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

## द्वितीय मुण्डक - प्रथम खण्ड

तत् एतत् सत्यं यथा सुदीप्तात् पावकात् विस्फुलिंगा:
सहस्रश: प्रभवन्ते सरूपा:।
तथा अक्षरात् विविधा: सोम्य भावा:
प्रजायन्ते तत्र च एव अपियन्ति ॥१॥

हे जे अक्षर ब्रह्म आहे, ते अगोचर, अग्राह्य अनिर्वचनीय आहे. त्याच्यापर्यंत पोहोचण्यासाठी त्याला जाणण्यासाठी प्रथम आपली पात्रता कर्माने सिद्ध करायची. कर्म— यज्ञ, दान, तप इ.

कृतयुगात तपाला महत्त्व होते.
त्रेतायुगात यज्ञयागाला महत्त्व होते
द्वापार युगात दानाला महत्त्व होते.
कलियुगात भक्तीला महत्त्व आहे.

समाज सुव्यवस्थित राहण्यासाठी प्रत्येकाने वेदप्रणीत नियमांचे पालन करून विहित कार्य करावे. आपल्या वर्णाश्रमानुसार प्राप्त झालेली कर्मेच करावीत. नियत कर्मांना फळ नसते मात्र न केल्याचा दोष मात्र असतो. त्यापलीकडे जाण्यासाठी यज्ञ दान तप आवश्यक आहेत. हाच सत्कर्माचा मार्ग आहे

सुदीप्त अग्नीपासून त्याच्यासारख्याच तेजस्वी असणाऱ्या हजारो ठिणग्या निघतात, त्याचप्रमाणे या अक्षर ब्रह्मापासून विविध भाव, अस्तित्व, विश्व इ० नाना पदार्थ निर्माण होतात.

या पृथ्वीवरच्या अनेक गोष्टींचे मूलतत्त्व एकच आहे असे शास्त्रज्ञही सांगतात. आकाशातील ग्रहगोल, पृथ्वीवरील दगड-माती, पान फूल, धातु-द्रव्य, झाडे वेली, तीक्ष्ण-कोमल अशा या भिन्न अवस्था दिसत असल्या तरी त्यांचे मूळ कारण एकच आहे.



©www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

दिव्यो ह्यमूर्तः पुरुषः सबाह्याभ्यन्तरो ह्यजः।
अप्राणो ह्यमनाः शुभ्रो ह्यक्षरात्परतः परः ॥२॥

दिव्य, अलौकिक असे हे परब्रह्म अग्राह्य, अमूर्त आहे. आत व बाहेर असा भेद यात नाही. ते अज (जन्मरहित) आहे. साखरेचा खडा जसा आतून बाहेरून सारखाच गोड असतो तसे हे आहे. प्राण म्हणजे हालचाल! यात हालचाल नाही म्हणून हा अप्राण आहे. मन म्हणजे चंचलता! ती यात नाही म्हणून हा अमन आहे. स्थिर आहे. निरवयव आहे. हा शुभ्र म्हणजे शुद्ध आहे. यात कोणतेही हीण मिसळलेले नाही.

हा अक्षराच्या पलीकडे आहे. जाणीव नेणीवेच्या मध्यावर हा आहे. व्यक्त-अव्यक्ताच्या पलीकडे आहे. म्हणजेच तो अव्यक्त असला तरी या व्यक्त जगाच्या पाठीमागे आहे. हा सर्वांत आहे परंतु कशातच नाही. म्हणजे परात पर म्हणजेच परतः परः आहे. ही अव्यक्तातून व्यक्त होण्यापूर्वीची म्हणजेच महत् नारायण स्थिती आहे.

सूर्य हा दिवसभरात केल्या जाणाऱ्या कर्मांचा केवळ प्रकाशक असतो. त्याच्या प्रकाशात केल्या जाणाऱ्या बऱ्या वाईट कर्मांचे पाप पुण्य त्याला बाधक ठरत नाही. त्याचप्रमाणे शुद्ध जाणीव तत्त्व हे शुद्ध/शाश्वत आहे आणि परमात्म तत्त्व हे श्रेष्ठापेक्षा श्रेष्ठतर आहे.

© www.madhaveeraghuveer.com

Birthday / Anniversary

एतस्मात् जायते प्राणो मनः सर्वेन्द्रियाणि च।
खं वायुर्ज्योतिरापः पृथिवी विश्वस्य धारिणी ॥३॥

या परब्रह्मापासून प्राण निर्माण झाला. मग संकल्पविकल्प करणारे मन तयार झाले त्यानंतर मनाच्या ताब्यात असणारी पाच ज्ञानेंद्रिये पाच कर्मेंद्रिये म्हणजे त्यांची सूक्ष्म रूपे निर्माण झाली. त्यानंतर आकाश, वायु, तेज, आप, आणि विश्वाला धारण करणारी पृथ्वी निर्माण झाली.

त्या ब्रह्मामध्ये या सर्व गोष्टी नसल्या तरी त्या निर्माण करण्याची शक्ती त्याच्याजवळ आहे. महत ही मधली स्थिती आहे.

त्या परमतत्त्वापासून ही सृष्टी निर्माण झाली. पंचमहाभूते, ५ ज्ञानेंद्रिये ५ कर्मेंद्रिये ही सर्व त्या अनादि तत्त्वापासून निर्माण झाली. मूळतत्त्व निर्विकार असून सृष्टि मात्र वारंवार बदलणारी आहे. यावर अनेकांनी आपली मते मांडली. शेवटी सर्वांचे सार एकच आहे.

अव्यय ब्रह्माच्या आधारावरच सृष्टी निर्भर आहे. त्याला वेगवेगळी नावे दिली. सत् चित् आनंद तोच आहे. विराट पुरुष, परात्पर, आत्मा, परमेश्वर, हिरण्यगर्भ, प्रजापती अशा अनेक नावांनी त्याचे वर्णन करतात.

अग्निर्मूर्धा चक्षुषी चन्द्रसूर्यौ
दिशः श्रोत्रे वाग् विवृताश्च वेदाः।
वायुः प्राणो हृदयं विश्वमस्य
पद्भ्यां पृथिवी ह्येष सर्वभूतान्तरात्मा ॥४॥

त्या विराट पुरुषाच्या मस्तकावर अग्नि शोभून दिसतो. चंद्र व सूर्य हे नारायणाचे दोन नेत्र आहेत. दिशा हे अनंताचे कान आहेत आणि प्रकट वेद ही त्याची वाणी आहे.

Birthday / Anniversary

© www.madhavraghuveer.com

वायु हा त्याचा प्राण असून विश्वाचा विस्तार हे त्याचे अंत:करण आहे. त्याच्या पायापासून पृथ्वी झाली. याप्रमाणे स्थूल अवयव आणि सृष्टीचे दिव्य भाव एकत्रित करून श्रुतींनी एका भव्य विराट पुरुषाची कल्पना केली तोच सर्वांच्या अंतर्यामी असून उपासकाने त्याची साधना करावी.

हे ब्रह्मांड अंड्याप्रमाणे आहे. याच्या वरच्या भागात सात लोक (स्वर्ग) व खालच्या भागात सात लोक (पाताळ) आहेत. जसे वर वर जाऊ तसतसे तेजस्वी लोक व जसे खाली जाऊ तसे अंधाराने वेढलेले लोक आहेत.

त्या एकानेच हे विराट रूप घेतले व तो त्यात भरून राहिला आहे. आत बाहेर तोच आहे.

तस्मादग्नि: समिधो यस्य सूर्य:
सोमात् पर्जन्य ओषधय: पृथिव्याम्।
पुमान् रेत: सिञ्चाति योषितायाम्
बह्वी: प्रजा: पुरुषात् संप्रसूता: ॥५॥

ज्याचे इंधन, ज्याची समिधा सूर्य आहे असा अग्नि प्रथम निर्माण झाला. त्यातून त्याच्या समिधेसारखाच सूर्य निर्माण झाला. सूर्यापासून चंद्र, चंद्रापासून पर्जन्य आणि ओषधी निर्माण झाल्या. ओषं धत्ते इति ओषधी:।
ह्या वनस्पती - अन्न, धान्य, शाक भाज्या, फळे इ. पुरुष खातो. व त्यातून सप्तधातू तयार होतात.
अस्थि, मज्जा, मांस, मेद, रक्त, वीर्य
त्या वीर्यातील प्रमुख जे शुक्र - रेत बनते. यामध्ये मनुष्य बीज असते. ते रेत तो स्त्रीमध्ये शिंपतो व अशा रीतीने पृथ्वीवर विपुल प्रजा निर्माण होते.

Birthday / Anniversary

© www.madhuveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

या उत्पत्तीच्या आद्य क्रमालाच पंचाग्नी असे म्हणतात.

(१) त्या विराट पुरुषापासूनच सूर्य ज्याच्या समिधा आहेत ते गगन निर्माण होते. आकाश — हा पहिला अग्नी

(२) चंद्रापासून मेघ (पर्यायाने पर्जन्य) उत्पन्न होतो. हा दुसरा अग्नी.

(३) पर्जन्यापासून पृथ्वीवरील वनस्पती निर्माण होतात. हा तिसरा अग्नी.

(४) या वनस्पतीपासून मनुष्याची निर्मिती होते. हा चवथा अग्नी

(५) आणि हा मनुष्य स्त्रीच्या ठिकाणी वीर्याचे सिंचन करतो. हा पाचवा अग्नी.

परमश्रेष्ठ तत्त्वापासून निर्मित जीवमात्रांची अनेकविध रूपे अशा प्रकारे अस्तित्वात येतात. ही त्याचीच वंशावळ आहे.

तस्मात् ऋचः साम यजूंषि दीक्षा
यज्ञाश्च सर्वे क्रतवो दक्षिणाश्च।
संवत्सरश्च यजमानश्च लोकाः
सोमो यत्र पवते यत्र सूर्यः ॥ ६॥

त्या परमपुरुषापासूनच ऋग्वेदातील ऋचा, सामवेदीय मंत्र, यजुर्वेदातील यज्ञपद्धती, तसेच यज्ञकर्मातील प्राथमिक विधि, सर्व यज्ञकर्मे, समारंभ, द्यावयाच्या दक्षिणा, यज्ञाचा काल, आणि यज्ञकर्ता यजमान, आणि जिथे सूर्य व चंद्र प्रकाश देतात असे लोक (उत्पन्न होतात).

वेद हे ईश्वरप्रणीत आहेत. ते अपौरुषेय आहेत. वेद म्हणजे परमेश्वराची निःश्वसिते आहेत. त्या परमेश्वरापासूनच ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेदांची निर्मिती झाली. यज्ञ करणाऱ्या यजमानाला दीक्षा



© www.madhavieeraghuveer.com

| August 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

द्यावी लागते. दी म्हणजे देणे आणि क्षा म्हणजे पचवणे काही नियम पाळावे लागतात. उदा. गादीवर न झोपणे, मिताहार इ.

परमेश्वराने सर्व प्रकारचे यज्ञ व ऋतु निर्माण केले. संवत्सर म्हणजे कालगणना आखून दिली आणि यज्ञाचे फळ म्हणून मिळणारे निरनिराळे लोक निर्माण केले. जिथे चंद्र, सूर्य प्रकाशतात असे तेजस्वी लोक निर्माण केले.

या विश्वाचा पसारा चांगल्या रीतीने चालावा यासाठी यज्ञ आहेत. यज्ञामुळे सृष्टीचा समतोल साधतो

तस्माच्च देवा बहुधा सम्प्रसुता:
साध्या मनुष्या: पशवो वयांसि।
प्राणापानौ व्रीहियवौ तपश्च
श्रद्धा सत्यं ब्रह्मचर्यं विधिश्च॥७॥

आणि त्याच्यापासूनच अनेक प्रकारचे वसुरुद्रादि देव निर्माण झाले. तसेच साध्य गण (स्वर्गीय देव) मानव, पशु-पक्षी निर्माण झाले. त्याच प्रमाणे प्राण-अपान हे वायु, तांदूळ-यव (सातू) ही धान्ये, तप, श्रद्धा, सत्य ब्रह्मचर्य आणि जीवनात आचरावयाचे यज्ञकर्मादि विधि उत्पन्न झाले.

साध्यगण - हे १२ प्रकारचे देव आहेत. हे सूक्ष्म पण फार मोठ्या योग्यतेचे देव आहेत. जे आधी देव नव्हते परंतु त्यांनी देवपद प्राप्त केले त्यांना साध्यदेव म्हणतात. काहींच्या मते दक्षकन्या साध्या व धर्म यांचे ते पुत्र असावेत.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

सप्त प्राणाः प्रभवन्ति तस्मात्
सप्तार्चिषः समिधः सप्त होमाः।
सप्त इमे लोका येषु चरन्ति प्राणाः
गुहाशया निहिताः सप्त सप्त ॥८॥

दोन डोळे, दोन नासापुटे, दोन कान व मुख असे सात प्राण आहेत. (मस्तकात त्यांची केंद्रस्थाने आहेत.) या सात प्राणांच्या सात जिव्हा आहेत. म्हणजे सात इंद्रियांची त्या विषयाबद्दलची प्रवृत्ती। त्यांचे विषय म्हणजे सात समिधा व त्या विषयांचा अनुभव म्हणजे होम. या इंद्रियांचे सात द्वार वा सात स्थाने म्हणजे सात लोक आहेत. या सात लोकांमधून जीव प्राण व्यवहार करत असतो व सुषुप्तिच्या वेळी लोपत सर्व इंद्रिये शयन करतात. (श्रोत्र, त्वक्, नेत्र, रसना, घ्राण, वाक्, मन)

सात - सूर्याचे घोडे, वार, रंग, सूर, चिरंजीव, ऋषी
पर्वत, पुरी, सरिता, द्वीप

पंचज्ञानेंद्रियांचे 5 विषय व मन बुद्धीचे विषय
अशा सात समिधा।

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

अतः समुद्रा गिरयश्च सर्वेऽस्मात्स्यन्दन्ते सिन्धवः सर्वरूपाः
अतश्च सर्वा ओषधयो रसश्च येनैष भूतैस्तिष्ठते ह्यन्तरात्मा

त्या ईश्वरापासून विराट मग व्यष्टि व मग हे अचेतन समजले जाणारे पदार्थ/वस्तू निर्माण झाल्या. याच्यापासूनच समुद्र निर्माण झाले. पर्वत, लहान मोठ्या नद्या वाहू लागल्या. या नद्यांनी सुपीक झालेल्या जमिनीत ओष, ओज निर्माण करणाऱ्या वनस्पती निर्माण झाल्या. यात तृणधान्ये, कडधान्ये, औषधी सर्व काही आले. पंचमहाभूतांनी बनलेल्या आपल्या शरीराला हे रस पुष्ट करतात. आणि या पंचभूतिक शरीरातच (भूतैः वेष्टितः शरीरे) अंतरात्मा राहतो.

सारांश, आपल्या ज्ञानेंद्रियांना गोचर असणारी सर्व नाम-रूपे, सर्व मनोभावना, बौद्धिक सामर्थ्य हे सर्व एकाच शाश्वत तत्त्वापासून निर्माण झाले आहे.

पृथ्वीवरील सर्व पर्वत, भूमीला वेढून राहिलेला समुद्र, पर्वतावरून वाहणारे जलप्रवाह ही सारी त्या विधात्याची निर्मिती आहे. हिरण्यगर्भापासून औषधी वनस्पती निर्माण झाल्या. सहा रस त्यानेच निर्माण केले. (मधुर, आम्ल, तिक्त, कटु, कषाय, लवण) आत्मा आणि शरीर यांच्यात राहून तो व्यवहार करतो म्हणून त्याला अंतरात्मा म्हणतात.

©www.madhaveeraghuveer.com

Birthday / Anniversary

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

पुरुष एवेदं विश्वं कर्म तपो ब्रह्म परामृतम्।
एतद्यो वेद निहितं गुहायां सोऽविद्याग्रंथिं
विकरतीह सोम्य ॥१०॥

हे विश्व, हो कर्म, हो तप हे सर्व केवळ पुरुषच आहेत. हे सर्व उच्च व अविनाशी ब्रह्म आहे. हे तेजस्वी युवका, जो त्याला हृदयस्थ गुहेत असल्याचे जाणतो, तो या लोकीसुध्दा अविद्या ग्रंथी सोडवतो.

या जन्माबरोबरच जे कर्म येते तेही ब्रह्मच आहे. तप म्हणजे त्याला जाणण्यासाठी केलेले प्रयत्न. तप म्हणजे तापवणे. आपले विहित कर्म अहंकारविरहित होऊन नेटकेपणाने करणे हे तपच आहे. अगदी शास्त्रज्ञ करतात ते तपच आहे.

हे जग आणि या जगातील सर्व गोष्टी ही त्याचीच रूपे आहेत म्हणजे नावच आहेत.

या हृदयरूपी गुहेत राहणाऱ्या त्याला जो जाणतो तो त्याच्याशी तदाकार होतो. त्याला ज्ञानप्राप्ति होते. त्याच्या अज्ञानग्रंथि सुटतात.

मी ब्रह्माहून वेगळा आहे असे वाटणे हेच अज्ञान! त्या अज्ञानामुळे सर्वत्र भेद दिसतो. ते अज्ञान गेले की त्याचे अस्तित्व सर्वत्र जाणवू लागते. मग भ्रम, संदेह अज्ञान काहीही शिल्लक रहात नाही.

आणि शौनकाने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर हेच आहे. की त्याला जाणले की त्यानेच घेतलेली ही वेगवेगळी रूपे आपोआपच जाणली जातात.



© www.madhaveeraghuveer.com

11 March 2017

## द्वितीय मुण्डक - द्वितीय खंड

8 am आविः सन्निहितं गुहाचरं नाम महत्पदमत्रैतत्समर्पितम्।
एजत् प्राणत् निमिषत् च यत् एतत् जानथ
9 सदसद् वरेण्यं परं विज्ञानात् वरिष्ठं प्रजानाम्॥१॥

10 तो तेजस्वी, अगदी जवळ असणारा, हृदयाच्या गुहेत
11 फिरणारा असा आहे. तो श्रेष्ठ आणि सर्वांचे अधिष्ठान आहे. त्याच्या ठिकाणी हे सर्व विश्व केंद्रित आहे.
12 जे चलायमान आहे, श्वासोच्छ्वास करते व पापण्यांची उघडझाप करते (तो पुरुष आहे) जे सरूप आणि अरूप
1 pm आहे. ते पूजनीय आहे. जे सर्व प्राणिमात्रात श्रेष्ठ आणि त्यांच्या बुद्धिमत्तेच्याही पलीकडे आहे ते तू जाण.

2 या विभागात सत्यतत्त्वाचे परिपूर्ण चित्र मांडले आहे आणि या वैभवशाली नियुक्त स्थळाकडे झेप घेण्याचा
3 सरळ मार्गही दाखवला आहे. या अशा वाक्शैलीत अर्थ समृद्धी भरलेली आहे.

4 (१) आविः — तेजस्वी - दृश्याला प्रकाशित करणारे असे काही तरी प्रकाशतत्त्व तिथे असले पाहिजे. हा खरोखर
5 बुद्धीतील ~~[illegible]~~ प्रज्ञातत्त्वाचा प्रकाश आहे.

(२) सन्निहितम् - अत्यंत जवळ असणारा! आपल्या व्यक्तिमत्त्वाचा केंद्रबिंदू असल्यामुळे तो इतका जवळ आहे की त्याच्या जवळिकीच्या मानाने आपले शरीर हेसुद्धा दूरच ठरते.
7 ते (तद्) म्हणजे दूरचे आणि हे (एतत्) म्हणजे जवळचे.

(३) हृदयात फिरणारा - गुहाचरम् - प्रेममय अंतःकरणात बुद्धीची गुहा असते. त्यात प्रज्ञा वास करते. हे चैतन्य तत्त्व म्हणजे प्रज्ञा शक्तीतील केंद्रस्थानाचा प्रकाश होय.

मानवाचे हृदय म्हणजे त्याच्यामध्ये जे काही उदात्त आहे त्याचे अधिष्ठान आहे. अशा ठिकाणीच केवळ दिव्य गुण किंवा आपल्यातील चैतन्यशक्ती शोधून



© www.madhaveeraghuveer.com

8 am काढण्यासाठी लागणारी सूक्ष्मता असू शकते
(४) <u>महत्पदम्</u> - शाश्वततत्त्व हे रूपरहित व सर्वव्यापी
9 आहे. सत्यतत्त्व हे सर्वांना व्यापून आहे. त्यामुळे
सत्यतत्त्व हे महानापेक्षा महान असले पाहिजे.
10 ते अनंत आहे. हे जाणीवतत्त्व जर काढून टाकले तर
काहीच उरणार नाही या अर्थाने ते सर्वांचे अधिष्ठान
11 आहे. माती - घट, सुवर्ण - अलंकार, सागर - बुडबुडे, लाटा, फेस
(५) <u>एजत्, प्राणत्, निमिषत्</u> -
12 निर्जीव घटकमात्र - नद्या, लाटा, आगगाडी, मोटार - हलणे
सजीव घटकमात्र - श्वासोच्छ्वास करतात - मुंगी, बेडूक इ.
1 pm बुद्धिमान प्राणिमात्र पापणी उघडझाप - मनुष्य, हत्ती, कुत्रा
हे परमश्रेष्ठ सत्यतत्त्व जाणून घ्यायचे आहे.
2 आपल्याहून अन्य अशा इतर विषय वस्तू आपण
ज्ञानेंद्रियांद्वारा जाणतो, त्या जाणण्याच्या अर्थाने हे
3 सत्यतत्त्व जाणायचे नाही / जाणताही येणार नाही. तर
इथे जाणिवेने स्वतःलाच जाणून घ्यायचे आहे.
4 सत्य जाणणे म्हणजे 'सत्य हे आपल्या स्वतःव्यतिरिक्त
दुसरे काही नाही' हे जाणणे आहे. या अनुभूतीने
5 आपल्याला जाणीव होते की आपण प्रत्यक्ष सत्यतत्त्वाखेरीज
काही नाही. आणि त्यासाठी आपल्याला विचारांच्या आणि
6 कल्पनांच्या रूपरहित जगाच्याही पलीकडे जावे लागेल
(६) <u>परं विज्ञानात् प्रज्ञानाम् वरिष्ठम्</u> - प्राणिमात्रांच्या
7 आकलनशक्तीच्या पलीकडे ते आहे हे विधान काही
नैराश्य निर्माण करण्यासाठी नाही किंवा स्वप्नवत्
असद्भावरूप सुंदर आदर्शवादाचा निर्देश उपनिषद करत
नाहीत. मात्र जडवादी तमोगुणी याचा विपरीत अर्थ लावतात.
चैतन्य हे बुद्धीच्या पलीकडे आहे असे विधान
करताना त्यातील सूक्ष्मता जाणून घ्यायला हवी.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

बुद्धीतील विचार करणारा कर्ता चैतन्यच आहे.
विचारांच्या उपकरणांच्या मागे विचार करणारा असल्या शिवाय त्यांना स्वतःची जिवंत शक्ती नाही. बुद्धी स्वतः विचार करून विचार करणाऱ्याला जाणू शकते असे मानणे हा तर्कशास्त्रातील मूर्खपणा आहे.

कोणीही स्वतःच्या खांद्यावर स्वार होऊ शकत नाही त्याचप्रमाणे चैतन्यतत्व हे आकलनाच्या सर्व उपकरणांच्या मागील आकलनतत्व आहे.

'मी' ने मला जाणून घेणे म्हणजे ज्ञान होय.

वास्तविक 'मी आहे' हे प्रमाणाने सिद्ध करण्याची मला गरज नाही. मी आहे मला माहित आहे. मला स्पष्ट आहे.

परंतु मी जे मला जाणते ते कोणत्या अर्थाने?
मी काळा, गोरा, उंच बुटका, सुंदर कुरूप आहे – शरीराचे गुण
मी हुशार, बावळट, चाणाक्ष, चतुर, वेंधळा आहे – बुद्धीचे गुण
मी संवेदनशील, भावुक, हळवा, कठोर आहे – मनाचे गुण

परंतु ते चैतन्य म्हणजे मी – याचे वर्णन करता येत नाही. तो गुहाचर आहे. त्याचा वावर शरीरभर आहे पण स्थान हृदयाकाशात आहे.

परायण म्हणजे पोहोचायचे ते स्थान। गन्तव्य। जिथून आलो तिथेच पोचायचे आहे. त्यासाठी खूप लांब जायला नको. माझ्या कणाकणात, पेशीपेशीत, रोमरोमात तो भरला आहे.

मी त्यावर प्रतिष्ठित आहे व त्याला समर्पित आहे.
केवळ मीच कशाला तर संपूर्ण विश्व त्यावर आधारित आहे.

• एजत् प्राणत् निमिषत् हा विश्वनिर्मितीचा क्रम आहे.

स्पंदन - हालचाल, प्राणशक्ती - श्वासोच्छ्वास आणि त्यानंतर डोळ्यांची उघडझाप – अव्यक्त व व्यक्त विश्व निर्माण झाले.

तो मेधातीत आहे. त्याचे अस्तित्व सर्वत्र जाणवते त्याला जाणून घेणे हे सर्वोत्तम ध्येय आहे.

Birthday / Anniversary

©www.madhaveeraghuveer.com

Priority

July 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

यत् अर्चिमत् यत् अणुभ्य: अणु च
यस्मिन् लोका: विहिता: लोकिन: च।
तत् एतत् अक्षरं ब्रह्म स प्राण: तत् उ वाङ्मन:
तत् एतत् सत्यं तदमृतं तत् वेद्धव्यम्। सोम्य विद्धि ॥२॥

जो तेजस्वी आहे, जे सूक्ष्मतमापेक्षा सूक्ष्मतर आहे, ज्यामध्ये निरनिराळे लोक व त्यांचे रहिवासी स्थित आहेत, ते हे अविनाशी ब्रह्म आहे. तेच प्राण, वाचा, मन आहेत. तेच हे सत्यतत्त्व आहे, ते अमृतत्त्व आहे, त्याचा मनाने वेध घ्यावा. हे सौम्य, तू त्याचा वेध घे.

अध्यात्मातील सूक्ष्मता ही त्याच्या व्यापकतेवरून मोजली जाते. उदा. दगड हा सर्वात घन आहे. तो लाकडापेक्षा घन आहे. लाकूड हे पाण्यापेक्षा घन आहे. पाणी हे वायुपेक्षा घन आहे. वायु हा आकाशापेक्षा घन आहे. म्हणजे जसजसे स्थूलाकडे जावे तसतशी घनता/जडता वाढत जाते. आणि सूक्ष्माकडे जात असता तरलता वाढत जाते.

सत्यतत्त्व तर सर्वव्यापी आहे. त्यामुळे ते सूक्ष्मापेक्षाही सूक्ष्मतर असले पाहिजे.

अणो: अणीयान् असे ते आहे.

निवास — ज्यातून आपण कामाकरता बाहेर पडतो आणि आपले काम आटोपल्यावर, दमलो म्हणजे परत येतो.

इथे ब्रह्माचे वर्णन विश्वाचे आणि त्यात राहणाऱ्या प्राणिमात्रांचे निवासस्थान म्हणून केले आहे.

आपणामध्ये आधिपत्य गाजवणाऱ्या या जीवनकेंद्राचा आपल्या मनानेच वेध घ्यायचा आहे.

चैतन्याचे शाश्वत स्वरूप हे सर्वव्यापी, सर्वोत्कृष्ट सर्व-पूर्ण आहे त्याचा वेध घ्या, वेध घ्या!

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

| August 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

*Priority*



वेदांतात ध्यानाची पद्धत अशी आहे.

१. इंद्रियांद्वारा जाणून घ्या.
२. मनाने त्याची भावना करा.
३. बुद्धीने त्याचे विकसन करा
४. अंत:करणात त्याची स्वानुभूति घ्या.

सौम्य (शौनका) तू चतुर, सूज्ञ आणि तेजस्वी आहेस. आपल्या साऱ्या शक्ती पणाला लावून तू ब्रह्माला जाणून घे ते ब्रह्म अणुहूनही सूक्ष्म आहे.

अणोरणीयान् महतो महीयान्।

दृष्टीला अतिसूक्ष्म पहाता येत नाही तसे अतिभव्यही दिसत नाही. आणि ब्रह्म तर अति सूक्ष्म व अतिभव्य ही आहे. हे बृहत् जग अणुंनी भरलेले आहे आणि प्रत्येक अणुमध्ये प्रोटॉन, न्यूट्रॉन, इलेक्ट्रॉन आहे हे विज्ञान सांगते.

वटवृक्षाची बी फोडून पाहिली तर आत काही नसते. परंतु त्यातूनच महावृक्ष उगवतो. दिसत नसला तरी तो बीजरूपाने तिथे होताच हे मान्य करावे लागते.

या सर्व विश्वाच्या मागे बीजरूप शक्ती आहेच त्या एकाचीच ही सारी वीण आहे असे तुकाराम महाराज म्हणतात. त्या ब्रह्माचाच हा सारा पसारा आहे. ते अक्षरब्रह्म म्हणजे ऊर्जा आहे. आणि ऊर्जा कधीच नष्ट होत नाही. तेच अक्षरब्रह्म आमच्यामध्ये प्राण बनून आले आहे. वाणी, मन, बुद्धी, विचार, इंद्रिये यातून तो प्रगट होतो.

तेच त्रिकालाबाधित सत्य आहे. जो ब्रह्म जाणतो तो ब्रह्मच होतो. अरे सौम्य, त्याचाच तर वेध घ्यायला हवा. बाणाने आपण लक्ष्याचा वेध घ्यायला हवा. बाण वेध घेताना लक्ष्यात घुसतो तसेच परब्रह्मामध्ये घुसून त्याच्याशी तद्रूप व्हायचे आहे.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

Priority



8 am
धनुर् गृहीत्वा उपनिषदं महास्त्रं
शरं ह्युपासानिशितं सन्धयीत ।
9
आयम्य तद् भावगतेन चेतसा
लक्ष्यं तत् एव अक्षरं सोम्य विद्धि ॥३॥

10
उपनिषद् प्रणीत (प्रभावरूप) महान् अस्त्र हे धनुष्य
11 घेऊन, त्याला उपासनेने तीक्ष्ण झालेला बाण लावावा.
भावयुक्त चित्ताने (चित्त ब्रह्मावर ठेवून) तो ओढून
12 हे सोम्य, त्या अविनाशी ब्रह्माचा (लक्ष्याचा) वेध घे.
ॐ इति एतत् (कठो. १.२.१५) असे उपनिषदात
1 pm सांगितले आहे. ॐ हेच परब्रह्माला दिलेले नाव आहे
तेच अक्षर ब्रह्म आहे. हा प्रणवच महाअस्त्र आहे.
उपनिषदकार ऋषी खरोखरच कवी होते.
2
ॐ चा आकार धनुष्याप्रमाणे आहे. प्रणवाचा उच्चार
3 ओढून - खोल करायचा. सर्व लक्ष केवळ लक्ष्यावरच
केंद्रित करायचे. त्यासाठी एकाग्रता हवी. त्याचबरोबर
4 श्रद्धा हवी. त्या पुरुषोत्तमाबद्दल काहीच प्रेम नसेल तर
काहीच उपयोग नाही. श्रद्धा असेल तर हा प्रणवच
5 अक्षर ब्रह्मापर्यंत निश्चित पोहोचवेल.
ॐ हे परब्रह्माचे नाव आहे. इकडून इंद्रियग्राह्य तर
6 त्या बाजूने परब्रह्माच्या अगदी जवळ आहे. Two way tape!

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

प्रणवो धनुः शरो हि आत्मा ब्रह्म तल्लक्ष्यमुच्यते ।
अप्रमत्तेन वेद्धव्यं शरवत् तन्मयो भवेत् ॥४॥

प्रणव हेच जणू धनुष्य, सोपाधिक आत्मा हाच जणू बाण, परब्रह्म हेच त्याचे लक्ष्य असे म्हटले आहे. दक्ष राहून (अप्रमत्त) त्याचा वेध घ्यावा. आणि मग बाण जसा लक्ष्याशी एकरूप होतो तसे (रुतुन बसतो तसे) त्याच्याशी एकजीव व्हावे.

३ आणि ४ या दोन मंत्रात काव्य व विचार यांचा मनोहारी मिलाफ झाला आहे. वाङ्मयकळेमुळे या मंत्राला उत्कृष्ट शोभा आली आहे. सर्व वेदांत साधना या २ मंत्रामध्ये निःशेषपणे ओतली आहे.

जेव्हा धनुष्याला बाण लावला जातो आणि प्रत्यंचेसह तो आपल्या बाजूला ओढला जातो, त्यावेळी बाणाचे टोक जरी बहिर्दिशेला रोखलेले असते तरी त्या वेळी धनुष्याची प्रत्यंचा वाकते आणि धनुर्धारीच्या बाजूस वळलेल्या बाणाच्या टोकाप्रमाणे होते.

जेव्हा प्रत्यंचा जास्तीत जास्त खेचली जाईल तेव्हा बाणावरील (आत्मतत्वावरील) आपली घट्ट पकड सैल करायची असते. एवढे करताच आकाशाच्या दिशेने होणारे बाणाचे उड्डाण आपोआप, त्वरित व तत्काळ होते.

उपनिषदांचे हेच सांगणे आहे. प्रत्यकातील आत्मतत्व त्याच्या लक्ष्याप्रत (ब्रह्माप्रत) पोहोचल्यावर समष्टी आत्मतत्वाशी एकरूप होऊन त्यात विलीन होते.

त्यासाठी बाण तीक्ष्ण (उपासनेने) हवा. आणि साधक अप्रमत्त हवा. तो अविचल हवा. बाण धनुष्यातून सुटेपर्यंत तो जराही विचलित झाला तरी लक्ष्य चुकू शकेल. मात्र स्थिर व एकाग्र मनाने तो ध्येयाप्रत पोहोचू शकेल.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

| July 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

जवळ जाणे, तदाकार होणे व तन्मय होणे या पायऱ्या आहेत. परमेश्वरामध्ये विलीन होणे म्हणजे तोच होणे आहे. ब्रह्मविद ब्रह्म एव भवति।
सराव चांगला झाला असला म्हणजे वेध अचूक घेता येईल. अर्थात ॐकार अर्थ समजून, स्वरयुक्त व श्रद्धेने म्हणायला हवा.

यस्मिन द्यौः पृथिवी च अन्तरिक्षम्
ओतं मनः सह प्राणैश्च सर्वैः।
तम् एक एक जानथ आत्मानम् अन्या
वाचो विमुञ्चथ अमृतस्य एष सेतुः॥५॥

ज्याच्यामध्ये मनासह सर्व प्राण, श्वास, स्वर्ग, पृथ्वी आणि अंतरिक्ष ही केंद्रित झाली आहेत, त्याला एकट्यालाच सर्वांचा आत्मा असल्याचे जाण. इतर सर्व (निरर्थक) बडबड टाळ (बंद कर.) अमृतत्वासाठी म्हणजेच भवसागर तरून जाण्यासाठी मनुष्याला एवढाच सेतु आहे.
सर्व विषय वस्तुंचे आणि प्राणिमात्रांचे संपूर्ण जग हे सत्यतः दुसरे काहीच नसून श्रेष्ठ जाणिवतत्त्व आहे. कारण हेच कार्याचे प्रत्यक्ष वस्तु-द्रव्य असते.
☆ त्याला एकट्यालाच जाण – स्वतः कर्त्याच जाणण्याचा विषय आहे. आणि जोपर्यंत बाह्य वस्तू, समस्या यात तो रमला आहे तोवर हा शोध शक्य नाही आणि म्हणूनच
☆ दुसऱ्या सर्व वायफळ गोष्टी बोलण्याचे टाळ. असे सांगितले आहे. जोपर्यंत चित्त बहिर्गामी असेल तोपर्यंत त्याला आत्मतत्त्वाच्या पुनःप्रत्ययाचा आनंद घेता येणार नाही. तोवर आपण सीमित व अपूर्ण असणार आहोत. आणि ही जाणीव गुदमरून टाकणारी आहे.

अन्या वाचो विमुञ्चथ– याचा अर्थ असाही आहे की अन्य अन्य भेद आहेत हे बोलणेही तू सोडून दे. त्या एकमेवाचे ध्यास घे. हाच अमृताचा सेतु आहे. आणि एकदा का त्याची अनुभूति आली की दिक्, काल, देह कशाचेही बंधन उरत नाही. देहात असून विदेहस्थिती प्राप्त होते. 'देह म्हणजे मी' हा भाव तर जातोच. पण जीव म्हणून मी वेगळा आहे, सीमित आहे. अपूर्ण आहे. हा भाव देखील नाहीसा होतो. अनंत, अविनाशी तत्त्वाशी तादात्म्य पावल्याने तो आनंदरूप होतो.

अरा इव रथनाभौ संहता यत्र नाड्यः
स एषः अन्तश्चरते बहुधा जायमानः।
ओम् इति एवं ध्यायथ आत्मानं
स्वस्ति वः पाराय तमसः परस्तात् ॥६॥

रथाच्या चाकाच्या आसाला ज्याप्रमाणे आरे जोडलेले असतात, त्याप्रमाणे जिथे देहातील सर्व नाड्या (ज्ञानतंतू) संलग्न असतात, तिथे (अशा हृदयात) बहुविध होऊन तो अनेक प्रकारे हालचाल करत राहतो. त्या आत्मतत्त्वाचे ॐ उच्चारणाने ध्यान करावे. अज्ञानरूप अंधकाराचे पैलतीर गाठण्यासाठी ईश्वर तुमच्यावर अनुग्रह करो.

चाकाचा आस हा परिघावरील प्रत्येक बिंदूशी जोडलेला असतो. आपल्या शरीरामध्ये डोक्यावरील केसांपासून ते पायाच्या करंगळीपर्यंत जीवनाचे जे केंद्र असते त्या शुद्ध जाणिवतत्त्वाची बैठक प्रेममय अंतःकरणाच्या केंद्रबिंदू मध्ये असते. योगशास्त्रामध्ये त्यांना नाड्या म्हटले आहे. ७२ हजार मज्जातंतूंनी त्या हृदयाशी जोडल्या आहेत.

© www.madhaveeraghuveer.com

Birthday / Anniversary

**July 2010**

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

8 am आपण ज्या क्रिया करतो, विविध अनुभव घेतो
ते कशामुळे, कोणामुळे? याचा विचार करू लागलो
9 की त्याच्या अस्तित्वाचा, शक्तीचा प्रत्यय येऊ शकतो.
तो आत्मा आहे. तो शरीरात परिमित आहे आणि
10 परमात्मा असीम, सर्वगत आहे इतकाच त्यांच्यामध्ये
फरक आहे. खरे तर आत्मा व परमात्मा एकच आहे
11 ॐ म्हणून त्याचे ध्यान कर. निश्चय तुला
परमात्म्याचे दर्शन होणार आहे.
12 ध्येय आणि ते गाठण्याचा मार्ग यांचे स्पष्टीकरण
केल्यावर आचार्य पूर्ण उत्साहाने आणि आनंदाने
1 pm आशीर्वाद देतात. — परमेश्वर तुमच्यावर अनुग्रह करो.
कारण इथे त्यांचे काम संपते. आता यापुढे केवळ
2 शुभेच्छा देऊन साधकाला प्रोत्साहित करणे शिल्लक
उरते. कारण पुढील वाटचाल साधकाला स्वतःच करायची
3 असते. प्रत्येक पाऊल त्याचे त्यालाच टाकायचे आहे

यः सर्वज्ञः सर्वविद्यस्यैष मोहमा भुवि।
दिव्ये ब्रह्मपुरे ह्येष व्योम्नि आत्मा प्रतिष्ठितः।
मनोमयः प्राणशरीरनेता प्रतिष्ठितोऽन्ने हृदयं सन्निधाय
तद् विज्ञानेन परिपश्यन्ति धीराः आनन्दरूपममृतं यद् विभाति॥

6 जो सर्व गोष्टी स्थूलपणाने आणि तपशीलासह
7 जाणतो, भूलोकात ज्याचाच मोहमा आहे, असा हा
आत्मा प्रकाशमय ब्रह्मपुरीत (हृदयाकाशात) स्थित आहे.
तो अन्नरूपी स्थूलदेहात हृदयरूपी ठेवा जतन
करून मनाला व्यापून, प्राण व शरीर यांना
मार्गदर्शन करीत स्थित आहे. (म्हणजेच मानवाच्या सर्व
शरीरात वास करत आहे. तो प्रकाशमान असा व्यक्त होतो
त्याचे परिपूर्ण ज्ञान करून घेऊन ज्ञानी लोक

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

8 am आनंदस्वरूप अशा अमृतत्वाची अनुभूति घेतात.
प्रत्येक निसर्गक्रमामागे त्याचेच वैभव / सामर्थ्य
9 असते. निसर्ग कधीही स्वतःच्या नियमाचे उल्लंघन
करत नाही. धर्मशास्त्र हे अनुल्लंघनीय, मोडता न येणारे
10 (अव्याहताज्ञः) असते. कायद्याच्या अनुक्रमाने राजाचे
वैभव असते आणि म्हणूनच भूलोकात केवळ त्याचाच
11 महिमा आहे असे म्हटले आहे. अस्य एव महिमा भुवि।
ब्रह्मपुरी - ब्रह्म किंवा समष्टि आत्मतत्त्व जिथे वास
12 करते ते स्थान। आत्मतत्त्वाचे राजगृह। आत्मतत्त्वाचे
हे साम्राज्य अत्यंत प्रकाशमान आहे. हे हृदयाच्या
1 pm गुहेत आहे असे मानले जाते.
या ब्रह्माची प्रचीती घेणे म्हणजे जीवनाच्या
2 सर्वश्रेष्ठ ध्येयाची पूर्ति करणे आहे. हा आत्मप्रत्यय
येण्यासाठी 'आत्मानात्मविवेक' हवा. उकळते दूध गार
3 झाल्यावर त्याच्यावर साय धरते. निर्धूम (निर्दोष) अशा
बुद्धीवर उकळल्यावर जेव्हा उदात्त अंतःकरण शांत होते
4 तेव्हा त्यावर विवेकाची साय निर्माण होते. विवेकाला
पृष्ठभागावर आणण्याची प्रक्रिया म्हणजे वेदांत साधना होय.
5 असे विवेकबुद्धीचे धन ज्याच्याकडे विपुल आहे
त्यांना वेदांतात धीराः म्हटले आहे.
6 सर्वज्ञ आणि सर्ववित् - तोच सर्व काही बनलेला
आहे. त्यामुळे आतून व बाहेरून सर्व काही तो जाणतोच.
7 प्रत्येक गोष्ट आणि सर्व बाजूंनी जाणतो.
सूर्य चंद्र त्याने आखून दिलेल्या मार्गाने जातात.
वारा, नद्या, पर्वत, दिवस रात्र सर्व काही त्याने सांगितल्या
प्रमाणे चालते. ही त्याच्या सृजनशीलतेची कमाल आहे.
ब्रह्मांडाच्या देहाशी सूर्य आहे. त्याच्या पलीकडे दिव्य
व्योमच आहे, चिदाकाश आहे.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

अहम् अस्मि - सुरगाठीतून निरगाठ पडते

Priority

वक्रतेमुळे गाठी पडतात. ECG. ओळख खालीवर असते
जीवन - अहंताच्या जोडीला विद्वान, सुंदर, श्रीमंत
शब्द आले की सरळ सोन्याला तिढा बसतो
त्यातून गाठ तयार होते. गाठीच्या आत शून्यात्मक
Space असते

July 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

भिद्यन्ते हृदयग्रन्थिः छिद्यन्ते सर्वसंशयाः।
क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन् दृष्टे परावरे ॥८॥
द्रष्टा

त्याच्या ठिकाणी खरे खोटे (पर + अवरे) उच्च-नीच दोन्हीही पाहिल्यावर जीवभावाची हृदयग्रंथि (अज्ञानाची गाठ) सुटते आणि त्याचे संशय संपून जातात. आणि त्याची सर्व कर्मे (कर्मफळांसहित) नाहीशी होतात.

सर्व कर्माणि रूपे आहेत. साते सप्तमी आहे

शुद्ध जाणीवतत्त्व हे नित्य-अनित्य यांचे अधिष्ठान आहे. सत्य आणि मिथ्या यामागील सार आहे.

दोरीवर सर्पाचा भास होतो.

स्थाणु (खांबावर) वर भुताचा भास होतो.

त्याअर्थी स्थाणु हे स्थाणुचे व भुताचे अधिष्ठान आहे.

दोरी हे दोरीचे व सर्पाचे अधिष्ठान आहे.

परंतु जसा सूर्याला अंधार माहीत नसतो. दोरीला सर्प माहीत नसतो. भ्रम झालेला मनुष्य जोपर्यंत भ्रमात आहे तोपर्यंत दोरीला दोरी म्हणून ओळखू शकत नाही. त्याला तो सर्पच वाटतो. मात्र जेव्हा दोरीकाच सर्प समजत होता हे समजते तेव्हा उलगडा उजेड पडतो.

त्याप्रमाणे जे उच्च आहे व नीच आहे त्या ब्रह्माचा साक्षात्कार झाल्यानंतर त्या ज्ञानी द्रष्ट्याला अविद्येचा अनुभव येणार नाही. त्याच्या मागील अंधार दूर होतो. अज्ञानाच्या ग्रंथी तुटून जातात.

नित्य-अनित्य, सत्य-मिथ्या, धर्म-अधर्म इ. संदेह सत्यतत्त्वाच्या अनुभूतीने विरून जातात. असा मनुष्य कर्मबंधनात अडकत नाही. जन्म मृत्युच्या चक्रात सापडत नाही.

अहंकारी कर्माच्या बाबतीत जीवभावच जबाबदार असतो. कर्मफळे भोगावी लागतात ती जीवालाच. आणि एकदा जीव सत्यतत्त्वात विलीन झाला की कोणी कर्ता

Birthday / Anniversary

देह प्रपंचाचा दास सुखे करो काम।

बंधनापासुन उकलण्या गाठी । धर्मध्रुवः - धर्माविषयी बोलणारे



उखळवण्यासाठी देखील गाठ मारली जाते किंवा अस्मितेतून गाठी पडतात.

Potential energy converts into Kynetic energy
शुध्द ब्रह्म —— शबल ब्रह्म

उरत नाही आणि कर्ता नाही म्हणून भोक्ताही नाही. आपले खरे स्वरूप आत्मतत्त्व आहे अशी प्रचिती आल्यावर सर्व अहंकार गळून पडतो आणि अशा साधुने प्रारब्ध कर्म जरी केले तरी तो अहंकारी नसतो. आणि यानंतर तो, कर्म करणारे परमेश्वराचे खेळणे होत असतो.

स्वप्नात केलेल्या खुनाला जसा तो जबाबदार नसतो तसेच हा जीवन्मुक्त महात्मा त्याच्या कर्मांना जबाबदार नसतो.

तो परब्रह्माशी एकरूप होऊन जातो. इथे 'इथे' याचा अर्थ पाहिल्यावर असा न घेता अनुभवल्यावर असा घ्यायचा आहे.

अहम - अहंता - अहंकार - ममत्व

अशा गाठी वाढत जातात. व त्यात आम्ही अडकून पडतो. परंतु सत्यतत्त्वाशी तद्रूप झाल्यावर 'मी - माझे' उरत नाही. कसल्याही शंका संदेह असत नाहीत. अविद्येचे पटल दूर होते. सर्व स्पष्ट, लख्ख होऊन जाते.

नवल उदेला चण्डांशु । मावळवीत विश्वाभासु ॥ ज्ञाने.

हिरण्मये परे कोशे विरजं ब्रह्म निष्कलम् ।
तच्छुभ्रं ज्योतिषां ज्योतिस्तद्यद् आत्मविदो विदुः ॥९॥

निर्मळ आणि निरवयव, विशुध्द आणि ज्योतींचीही ज्योती असलेले ते ब्रह्म प्रकाशमान आणि सोनेरी अशा आनंदमय कोशाच्याही आत विराजमान असते असे आत्मज्ञानी लोक त्याला समजतात.

या खंडातील विषयाच्या उपसंहाराला आता सुरुवात करत आहे. इथे हेतुपूर्वक पुनरावृत्ती केली आहे.

Birthday / Anniversary

रामो विग्रहवान् धर्मः । राम कधीही धर्माला प्रतिकूल वागू शकत नाही

© www.madhuveeraghuveer.com

मानवी व्यक्तिमत्व हे प्रकृतीच्या समकेंद्रित पाच वर्तुळांनी वेढलेले चैतन्य आहे. हेच ते पाच कोश आहेत. या बाह्य कोशांशी असणारे तादात्म्य काढून आपले अवधान आत वळवायचे असते. अशा रीतीने अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय या ४ कोशांशी असलेल्या तादात्म्याचा त्याग केला की ही अवस्था पारलौकिक आनंदमय व परमशांत समजली जाते. वास्तविक आनंदमय कोश ही नकारात्मक सुखाची अवस्था आहे. म्हणजे तिथे दुःखाचा अभाव असतो. परंतु दुःखाचा अभाव म्हणजे आनंद नव्हे. विक्षेपरहितता म्हणजे शांति नव्हे.

जाणिवतळाच्या अत्यंत जवळ असणारा हा आनंदमय कोश 'सोनेरी' समजला जातो हा उच्चतम कोश आहे.

आपण स्वतः शुद्धतत्त्वापासून वेगळे नाही आहोत. हा शोध या कोशातच लागतो. ते ब्रह्म निष्कल-निरवयव आहे. तो निष्कलंक आहे.

प्रत्येक नामरूपात्मक खेळणारी जीवनशक्ती एकच आहे. परंतु व्यक्तिमत्व भिन्न आहेत. बल्बमधील भिन्न दिवा म्हणजे विद्युत शक्ती भिन्न नव्हे तर काचेची काच भिन्न आहे. त्यामुळेच कुणी गुन्हेगार तर कुणी साधु असतो.

ते ब्रह्म कुठे आहे तर दिव्ये व्योम्नि। म्हणजे तेजस्वी कोशात आहे. त्यात कोणतेही डाग मिसळले नाही. ते मलरहित आहे, शुद्ध आहे.

ते ज्योतींची ज्योती आहे. म्हणूनच सर्व प्रकारच्या ज्योतिंना तेज पुरवणारा आहे. तेजाचा स्रोत आहे

ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमसः परमुच्यते।
ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य विष्ठितम्॥

September 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

*Priority*

SUN AUG 2010 **1**

Wk 30, 213-152

न तत्र सूर्यो भाति न चन्द्रतारकं
नेमा विद्युतो भान्ति कुतोऽयमग्निः।
तमेव भान्तमनुभाति सर्वं
तस्य भासा सर्वमिदं विभाति॥१५॥

तिथे म्हणजे त्या ब्रह्मस्वरूपापुढे सूर्याचे तेज प्रभाव पाडू शकत नाही. चंद्र, तारे, विजेचे तेजही त्याच्यासमोर फिके पडते तर मग ह्या अग्निच्या तरी किती प्रकाश पडणार? ते प्रकाशते म्हणूनच केवळ सर्व प्रकाशतात. त्याच्या प्रकाशानेच हे सर्व जग प्रकाशित झाले आहे.

माध्यान्हीच्या प्रखर सूर्यप्रकाशात पेटवलेल्या आगकाडीचा प्रकाश जसा दिसणार नाही. त्याचप्रमाणे सर्वांना प्रकाशमान करणारे जे आत्मतत्त्व, त्याच्यापुढे सूर्याचे तेज सुद्धा प्रकाशत नाही. सूर्याची ही स्थिती तर त्यापेक्षा कमी तेज असणारे चंद्र तारे, विद्युत यांचे तेज किती पडणार? अशा वेळी कापूराच्या लहानशा ज्योतीने परमेश्वराला ओवाळणे किती व्यर्थ आहे याची भक्ताला कृतज्ञतेने जाणीव होते आणि म्हणून तो म्हणतो कुतोऽयमग्निः?

परब्रह्माच्या तेजाचा आविष्कार प्रथम ~~[illegible]~~ वीजेच्या रूपाने झाला पण ते तेज स्थिर नाही. मग चंद्ररूपाने तो प्रकाश स्थिर झाला. पण त्याचे तेज शीतल आहे त्यामध्ये सृजन (निर्मिती) होऊ शकत नाही आणि म्हणून मग तेजाकार, खरा उष्णता देणारा सूर्य आला. हा हिरण्यगर्भ आल्यानंतर निर्मिती सुरू झाली.

हाच मंत्र कठोपनिषदात २.२ मध्ये आला आहे.

न तद् भासयते सूर्यो न शशांको न पावकः। — गीता १५.६
रवि शशी अग्नि नेणती ज्या रूपा॥

Birthday / Anniversary

श्वेताश्वतर उपनिषदातही हा मंत्र आहे. ६.१४
अत्यंत महत्त्वपूर्ण व लोकप्रिय मंत्र आहे.

© www.madhaveeraghuveer.com

August 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

8 am ब्रह्म एव इदं अमृतं पुरस्तात्
ब्रह्म पश्चात् ब्रह्म दक्षिणतः च उत्तरेण।
9 अधश्च ऊर्ध्वं च प्रसृतं ब्रह्म
एवं इदं विश्वम् इदं वरिष्ठम्॥११॥

10

हे अविनाशी ब्रह्मच समोर, मागे, उजव्या-डाव्या बाजूला, खाली-वर आणि प्रत्येक ठिकाणी भरून आहे. हे सर्व विश्वच खरोखर परम-श्रेष्ठ ब्रह्म आहे.

सर्व विषय-वस्तूंच्या, भावनांच्या आणि विचारांच्या जगताचे अंतिम कारण केवळ ब्रह्मच आहे. मृत्तिकापात्र हे मातीशिवाय दुसरे काहीच नाही.

ते मातीतून तयार होते मातीमध्येच स्थित आहे आणि मातीतच मिळते. माती हेच त्याचे कारण व माती हेच कार्य असते.

त्याचप्रमाणे केवळ ब्रह्म हेच विश्वाचे कारण आहे, ते सर्वव्यापी व एकजिनसी सत्यतत्त्व आहे.

तेच अविनाशी ब्रह्म सर्वत्र आहे, तेच सर्व रूपातून नटलेले आहे. ते आकाशाप्रमाणे सूक्ष्म असून अत्यंत व्यापक आहे. तोच अनेक शरीर धारण करतो व त्यांच्यात तो भरून राहतो.

सोने सोनपणा उणे। न येताचि झाले लेणे।
तेवि न वेचता जग होणे। अंगे जया॥४॥
कल्लोळकंचुक। न फेडिता उघडे उदक।
तेवी जगेसी सम्यक। स्वरूप जो॥५॥ चां.पां.५
परमाणूचिया मांदिया। पृथ्वीपणे न वेचची वाया।
तेवि विश्वस्फूर्ति इया। आकळेना जो॥६॥
असे चांगदेव पासष्टी मध्ये म्हटले आहे.

Birthday / Anniversary ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत्।

© www.madhaveeraghuveer.com

२५ मार्च २०१८

September 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

Priority ॥ श्री ॥

तृतीय मुण्डक - प्रथम खण्ड

TUE AUG 3 2010

Wk 31, 215-150

8 am द्वा सुपर्णा सयुजा सखाया
समानं वृक्षं परिषस्वजाते।
तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्य
नश्नन् अन्ये अभिचाकशीति ॥१॥

10 मैत्रीने एकमेकांशी बांधले गेलेले दोन पक्षी, एकाच
11 झाडावर उडून येऊन बसतात. त्यांच्यापैकी एक त्या
झाडाचे फळ मोठ्या चवीने खातो. तर दुसरा
12 काही न खाताच नुसता पाहत राहतो.

एका झाडावर म्हणजे शरीररूपी वृक्षावर! पक्षी
1 pm म्हणजे आत्मा! जो एका शरीरातून दुसऱ्या शरीरात
जातो, उडून जातो म्हणून त्याला पक्ष्याची उपमा
2 दिली आहे. आता प्रश्न असा उद्भवतो की प्रत्येकाला
काय दोन आत्मे आहेत का? आणि जर नसतील तर
3 दुसरा पक्षी म्हणजे कोण?

माणूस जन्माला येतो तेव्हा चैतन्य ~~घेऊन~~ घेऊन
4 जन्माला येतो. शरीर, मन जड आहे. त्यांना कार्यरत
करण्याचे काम हे चैतन्य करत असते. केवळ
5 माणसातच नव्हे तर पाना, फुलात, वृक्ष वेली, पर्वत
पाषाणातही हे चैतन्य असतेच.

6 परंतु माणसामधील या चैतन्याचे शुद्ध स्वरूप
फार काळ टिकत नाही कारण त्यावर अहंतेचे
7 आवरण येते. ममतेमुळे ते आवरण अधिक वाढत
जाते. त्यामुळे शुद्ध चैतन्य झाकले जाते.

परंतु ते पूर्ण नाहीसे झाले नसते. ते मधूनमधून
जागून इशारा देते. हा साधका आतला आवाज! परंतु
त्याकडे फारसे लक्ष दिले जात नाही.

आपल्यातच या दोन बाजू, दोन स्थिती म्हणजेच
Birthday / Anniversary हे दोन पक्षी आहेत.

©www.madhaveeraghuveer.com

केवळ अस्तित्वाचा आनंद घेणारा मी वेगळा,
आणि कशाच्यातरी पाठीमागे धावणारा मी वेगळा!
दोन्ही मानसिक रूपे आहेत. या मेंदूत वर्तन केलेली रचनाकार फक्त म्हणजे कर्मफले आहेत. कधी गोड तरी कधी कडू! हा पक्षी आवडीची चांगले मिळवण्यासाठी धडपडत असतो.

पण आतला खरा मी मात्र तटस्थ असतो. या सर्व धडपडीकडे तो साक्षीभावाने पहात असतो. तर कधी कधी या धडपडीमागच्या फोलपणा पटवून सांगण्याचा प्रयत्न करतो. तो साक्षी तटस्थ पक्षी म्हणजे आध्यात्मिक दिव्य स्फुलिंग आहे. तो कर्मही करत नाही आणि सुखाचा उपभोग किंवा दुःख सोसणारा म्हणून नाही हा मिरवत नाही.

आकाशातील सूर्यबिंब कधी कंप पावत नाही परंतु तळ्यात पडलेले प्रतिबिंब किंवा आरशातील प्रतिबिंब मात्र कंप पावते. त्याप्रमाणे जीव हा त्या जाणिवतत्त्वाचे प्रतिबिंब आहे. आणि मनाचे विक्षेप जीवामध्ये चंचलतेची भावना निर्माण करतात. आणि जीवभावाशी तादात्म्य पावल असल्यामुळे आपणच विक्षेपित आहोत असा भ्रम निर्माण होतो.

जीव हा भ्रांतीमुळे फळांना चोच मारत असतो आणि त्या त्या फळाच्या चवीप्रमाणे (कडू-गोड) सुख दुःख उपभोगत असतो. हे सर्व चालू असताना शांत बसलेला दुसरा पक्षी केवळ साक्षीभावाने पाहत असतो. तो काही फळापासून सुख मिळवण्याची इच्छा करत नाही.
परंतु तो काही खात नाही म्हणून मलूल/अशक्त होत नाही. तो मजेत आहे. तेजस्वी आहे.

हमको कलकी फिकर सताती
वो बस आजका जश्न मनाता था वो

वास्तविक कर्मफळे म्हणजे आपल्या पूर्वकर्मांच्या प्रतिक्रिया असतात. आपण त्यांच्याशी तदाकार होतो म्हणून आपल्या वाट्याला सुख किंवा दुःख येत असते.

मात्र वरच्या फांदीवरचा तो पक्षी मात्र या सर्व प्रकाराकडे साक्षीभावाने पाहत असतो त्यामुळे सर्व वेदना दुःखे अपूर्णता यांच्या पलीकडे तो असतो.

जोवर आपण हलत्या जिन्यावर उभे आहोत तोवर हेलकावे होणारच. जर स्थिर भूमी हवी असेल तर बाजूला होऊन जमिनीवर पाऊल ठेवायला हवे.

त्याचप्रमाणे जोपर्यंत आपण सदा हलत्या (परिवर्तनशील) प्राकृतिक स्तरावर काम करत राहू तोपर्यंत आपल्याला शांति आणि आनंद मिळणार नाही. मात्र या मिथ्या तद्रूपतेतून बाजूला सरल्याबरोबर शाश्वत, अनंत, शुद्ध अशा जाणिवतत्वाच्या स्तरावर येऊन जेव्हा शांति व वैभवाची प्राप्ती होणार आहे. म्हणजेच शुद्धचैतन्य व शाश्वत स्वरूपाशी एकरूप व्हायला हवे.

समाने वृक्षे पुरुषो निमग्नोऽनीशया
शोचति मुह्यमानः ।
जुष्टं यदा पश्यत्यन्यमीशमस्य
महिमानमिति वीतशोकः ॥ २ ॥

मागील मंत्रात वर्णन केल्याप्रमाणे शरीररूपी एकाच वृक्षावर बसलेल्यांपैकी एक पक्षी जीव – (अज्ञानात बुडालेला) मोहित झाल्यामुळे शोक करतो जेव्हा तो दुसऱ्या पक्ष्याच्या ठिकाणच्या ईश्वराला व त्याच्या वैभवाला पाहतो, तेव्हा स्वतः विषादापासून मुक्त होतो.

दोन पक्षी आहेत परंतु दोघांची वृत्ती वेगवेगळी आहे. खालचा पक्षी देहालाच 'मी' समजतो. ऐहिक गोष्टीत रमतो. सुखाच्या आशेने धावत सुटतो. फळांमागून फळ खातो पण तरीही समाधान, शांति काही मिळत नाही. पराधीन होतो. हतबल, दुःखी, भ्रमित होतो.

इतक्यात त्याची नजर वर जाते. वरचा पक्षी तेजस्वी आहे, महान आहे, तो स्वामी (ईश) आहे. त्याचा महिमा मोठा आहे. त्याच्याकडे हे सर्व आले कुठून? असा विचार करून तो थोडा वर जातो. इतक्यात एखादे फळ त्याचे लक्ष वेधून घेते. पुन्हा तो खाली येतो.

चुकीच्या कल्पना, आसक्ती, पापवासना, भोगलालसा, भय आणि निराशा ही सर्व जीवाची मिथ्या मूल्ये आहेत. यांच्यामध्ये जीवाला खेचण्याची ताकद असते. पण कुठपर्यंत? तर जोपर्यंत जीव हा सत्य व नित्यतत्त्वाचा शोध घेण्यात यशस्वी होत नाही तोपर्यंतच! मात्र जेव्हा तो वरच्या पक्ष्याकडे म्हणजेच परमेश्वराकडे पाहतो, त्याच्या वैभवाची प्रचीती घेतो तेव्हा तो विषादापासून मुक्त होतो.

जसजसा त्याचा ऐहिकाबद्दलचा मोह सुटत जातो, चित्त शुद्ध होत जाते तसतसे त्याचे भेद दूर होत जातात. आपल्या शक्ति स्रोताचा विचार करता करता त्याला जाणवते की भास अस्तित्व किंवा 'मी' चे जे स्फुरण आहे ते त्याचेच स्फुरण आहे.

आणि नुसता पाहण्यातच नाही तर या सर्व ब्रह्मांडात तोच भरून राहिला आहे. तोच वेगवेगळ्या रूपात वावरतो, लीला करतो.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

यदा पश्यः पश्यते रुक्मवर्णं
कर्तारमीशं पुरुषं ब्रह्मयोनिम् ।
तदा विद्वान् पुण्यपापे विधूय
निरञ्जनः परमं साम्यमुपैति ॥३॥

द्रष्टा (ज्ञानी-पश्यः) जेव्हा विश्वकर्मा अशा ब्रह्मदेवाचेही अधिष्ठान असणाऱ्या स्वयं तेजस्वी, सर्वांचा कर्ता आणि अधिपती अशा पुरुषाला जाणतो, तेव्हा तो निष्कलंक असा विद्वान आपली सर्व पाप-पुण्ये टाकून देऊन परमश्रेष्ठ अशी साम्यावस्था प्राप्त करून घेतो.

खालचा पक्षी जेव्हा वरच्या पक्ष्याच्या वैभवाकडे आकर्षित होतो तेव्हा त्याला स्वतःच्या कमीपणाची, असहाय्यतेची जाणिव होते. त्याच्यासारखे व्हावे अशी ओढ लागते. ही जाणिव होणे हे अध्यात्म क्षेत्रात टाकलेले पहिले पाऊल आहे. स्वतः अपूर्ण, परिच्छिन्न, परवश असल्याची जाणीव झाल्याशिवाय पूर्णत्वाचा, अपरिमिततेचा ध्यास लागणार नाही.

तो वरचा पक्षी लखलखीत सोनेरी वर्णाचा आहे. त्याने दिलेल्या ऊर्जाशक्तीने आम्ही कामे करतो. तो सर्वांचा नियंत्रक (ईश) आहे. त्याच्या आज्ञांचे उल्लंघन कोणालाही करता येत नाही. त्याच्यामुळेच सजीवता येते. एकदा त्याचे ज्ञान झाले की त्याची ओढ लागते. त्याची ओढ लागली की पापपुण्याचे लेप गळून पडतात. हे गळून पडले की तो निरंजन होतो, शुद्ध-निर्मळ होतो. आणि मग पाण्यात पाणी मिसळावे तसा त्या सर्वश्रेष्ठाशी एकरूप होतो, तद्रूप होतो. तन्मय होतो. देहात राहून विदेही होतो. अहं त्या वेढीतून सुटतो. असीम, अपार, अनंत होतो.

© www.madhaveeraghuveer.com

Priority मी हजार चिंतांनी हे डोके खाजवतो
तो कट्ट्यावर बसतो, घुमतो, शिकवतो

त्याला देहाचे बंधन उरत नाही. असे द्रष्टे लोक मग (जणूकी) देहातीत, गुणातीत होतात. जणू काही ते चालते बोलते ब्रह्मच होतात.

असा तत्पर व भाग्यवान साधक शोध घेत घेत ते सत्यतत्त्व / जाणीवतत्त्व मीच आहे असा यशस्वी होतो तेव्हा त्याच्यातील सर्व विनाशी विक्षेपांचा अंत होतो. त्याच्यामधील मर्यादितपणाची, अनित्यत्वाची भावना विरून जाते. जगातील कोणतीही परिस्थिती त्याला अडवू शकत नाही, अस्वस्थ करू शकत नाही. उलट अनेकांसाठी तो आशेचा, शांतीचा निश्चल असा दीपस्तंभ ठरतो. तो देवमाणूस होतो.

प्राणो हि एषः यः सर्वभूतैर्विभाति
विजानन् विद्वान् भवते नातिवादी ।
आत्मक्रीड आत्मरतिः क्रियावान्
एष ब्रह्मविदां वरिष्ठः ॥४॥

जो सर्व भूतमात्रांमधून व्यक्त होतो असा हा खरोखर प्राणांचाही प्राण आहे. त्याला जाणल्यानंतर ज्ञानी मनुष्य मितभाषी होतो. स्वतःच्या ठिकाणी क्रीडा करणारा आणि आत्मतत्त्वातच रममाण होणारा तसेच स्नान, ध्यान इ. विहित कर्मे करणारा असा महात्मा ब्रह्मवेत्त्यांत श्रेष्ठ असतो.

प्राणांचा प्राण असणारा जो परमेश्वर, तोच या सर्व भूतमात्रांत विलसत असतो. खरे तर ती चित् शक्तीच ही सर्व रूपे घेऊन क्रीडा करत असते. ज्याला ह्या गोष्टींची जाणीव होते तो अतिवादी राहू शकत नाही, मध्यस्थ राहून तोच हे सर्व कार्य करत आहे याची कृतज्ञतापूर्वक जाणीव



© www.madhaveeraghuveer.com

असल्याने अहंकाराचा लेशही उरत नाही. दुसऱ्या कुणाशी वाद घालावा, खोडून काढावे अशी खुमखुमीही उरत नाही. तो आत्मतुष्ट होतो. आपलेच मनोव्यापार निरखतो. जगाच्या वागण्याची मौज घेतो. स्वतःतच मग्न होतो. तो आत्मरत होतो.

मात्र तो निष्क्रिय नसतो. सर्व कर्मे करूनसुद्धा अकर्मच करतो. दुसऱ्यांना आदर्श घालून देण्यासाठी तो सर्व कर्मे करतो. पूजा-अर्चा भक्ती करत असतो. वास्तविक पाहता त्याला या अवडंबराची गरज नसते परंतु तरीही लोकरीत पाळतो. लोककल्याणासाठी तो लोकाभिमुख होतो. लोकसंग्रह करतो. लोकांसाठी तो क्रियावान राहतो आणि अशा लोकांकडून जगाला फार मोठा लाभ होतो. याज्ञवल्क्य, शंकराचार्य, समर्थ रामदासस्वामी ----

काही ब्रह्मविद अरण्यसेवन करतात. स्वतः मध्ये रमून जातात. जनसंपर्क नसतो. पण अशा लोकांपेक्षा लोकांत राहून लोकांसाठी कार्य करणारे अधिक श्रेष्ठ आहेत. आणि असे ज्ञानेश्वर, तुकारामांसारखे संत आम्हाला अधिक जवळचे वाटतात.

| आत्मक्रीड — खेळणे | आत्मरति — रमणे |
|---|---|
| बाह्यविषयवस्तूंशी संपर्क आल्याने होणारा आनंद | संपर्काविना आपल्यामध्येच मिळणारा आनंद |

अशा आत्मरताला कोणतेही कर्म उरत नसले तरीही तो कार्य करत राहतो. कुर्यात् विद्वांस् तथा सक्तः चिकीर्षु----
सोपाळू साधू आणि निष्क्रिय महात्म्यांच्या हास्यास्पद कल्पनेला इथे सुरुंग लावला आहे. (क्रियावान् या शब्दाने)

Birthday / Anniversary

©www.madhaveeraghuveer.com

अशा ईश्वरी साक्षात्कार झालेल्या क्रियावान् पुरुषांच्या आशीर्वादामुळेच आज संस्कृती व सभ्यता टिकून आहे. नाहीतर रानटी पशू व जनावरांचाच समाज उरला असता. पशुपासून मानव आणि पुढे देवत्वाच्या प्रवासासाठी अशा लोकांचे मार्गदर्शनच उपयोगी पडते.

उच्चतम तत्त्वज्ञान, तदनुषंगिक साधना ही या देवमाणसांचीच देणगी आहे. अशांची संख्या आज कमी झाल्यामुळेच आणि संस्कृती अनभ्यासामुळे किंवा गैरवापरामुळे राष्ट्र अवनतीकडे चालले आहे.

असे ज्ञानी आचार्य स्वार्थी कर्माला विरोध करतात. मात्र त्याच वेळी निःस्वार्थी उपकारक अशी कर्मे करायलाच हवीत असा आग्रह धरतात. असे निःस्वार्थी उपकारक करणाऱ्या साधूंचा गौरव इथे केला आहे आणि त्यातील सहजतेला सन्मान दिला आहे.

सत्येन लभ्यस्तपसा ह्येष आत्मा
सम्यग्ज्ञानेन ब्रह्मचर्येण नित्यम् ।
अन्तःशरीरे ज्योतिर्मयो हि शुभ्रम्
यं पश्यन्ति यतयः क्षीणदोषाः ॥ ५ ॥

सत्यवचनी राहून, तपसाधना करून, संपूर्ण ज्ञान प्राप्त करून, ब्रह्मचर्य व्रताचे पालन करूनच खरोखर हे आत्मतत्त्व प्राप्त करता येते. म्हणून या गुणांचे सातत्याने जतन कर. अशा गुणांच्या सतत अंगी बाळगण्याने ज्यांनी आपल्यातील दोष घालवले आहेत असे यती (तपस्वी) जो तेजस्वी व निष्कलंक आहे अशाला आपल्याच शरीराच्या अंतर्यामी पाहतात.

Birthday / Anniversary

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

4 April 2017

सत्यमेव जयति नानृतं
सत्येन पन्था विततो देवयानः।
येन आक्रमन्ति ऋषयो हि आत्म~~[illegible]~~:कामाः
यत्र तद् सत्यस्य परं निधानम्॥

सत्य म्हणजे सदावर्तमान असणारे तत्त्व. असत्य म्हणजे जे टिकणारे नाही ते!

सत्याचाच नेहमी जय होतो याचा अर्थ जी सर्वश्रेष्ठ स्थिती आहे तेच शेवटी शिल्लक राहते. ज्यात रूपांतरण नाही ते सत्य. इथे सत्याच्या ही वरची स्थिती म्हणजे ऋत आहे. कारण व्यवहारात प्रत्येकाचे सत्य वेगळे असू शकते. मात्र ऋत हे वैश्विक हिताचे व न बदलणारे असते. खोटे कधीही टिकत नाही.

देवयान मार्ग हा सत्याने स्पष्ट होतो. जीवनातील संकटे सत्यामुळे ~~[illegible]~~ नष्ट होतात. आणि सारे काही सोपे होऊन जाते. सत्य हेच चिरस्थायी ठरते.

गारगोटीचे मोल वाढवून सांगितले म्हणून त्याला रत्नाचे मोल प्राप्त होत नाही. राक्षस जरी चक्रवर्ती राजा झाला तरी त्याला प्रतिष्ठा लाभत नाही.

परंतु ज्यांच्याजवळ काहीही नाही, जे कफल्लक आहेत. जे सारे सोडून वनात गेले आहेत असे ऋषी मात्र वंदनीय ठरतात. हा सत्याचा, तेजाचा मार्ग आहे.

अहंता, कपट, दंभ, डामडौल सोडून जे सत्याची कास धरतात. त्यांचीच उन्नती होते. सत्याच्याच मार्गाने आपल्या दोषांना जिंकून साधक नित्य नूतन ऋषी होतात.

जीव दोन मार्गाने वर जातो - देवयान, पितृयान. ऐहिकात, वासनेत गुरफटलेले लोक पितृयानाने जातात. पुण्य भोगून पुन्हा मृत्युलोकी येतात.

Birthday / Anniversary

मात्र देवयान हा सत्याने परिपूर्ण, तेजाचा मार्ग आहे

या मार्गाने आत्मतुष्ट ऋषी जातात. ज्यांना कोणत्याही इच्छा उरलेल्या नाहीत. ज्यांचे बाह्य आकर्षण संपलेले आहे. असे श्रेष्ठ ऋषी सत्याच्या श्रेष्ठ धामापर्यंत म्हणजेच परमेश्वरापर्यंत जाऊन त्याच्याशी एकरूप होतात. त्यांना पुन्हा परत यावे लागत नाही. आणि हेच आपल्या आयुष्याचे ध्येय असायला हवे.

बृहत् च तत् दिव्यमचिन्त्यरूपं
सूक्ष्मात् च तत् सूक्ष्मतरं विभाति।
दूरात् सुदूरे तदिहान्तिके च
पश्यत्सु इहैव निहितं गुहायाम्॥७॥

ते ब्रह्म अतिविशाल, दिव्य आणि तर्कातीत आहे आणि ते सूक्ष्माहून अधिक सूक्ष्म असून अत्यंत प्रकाशमान आहे. ते दूरापेक्षाही सुदूर आहे. या ठिकाणी, आतच आहे साक्षात्कारी पुरुषांना ते, त्यांच्या हृदय गुहेत असल्याची याच जन्मी प्रचीति येते.

बृहत् चा खरा अर्थ विशाल किंवा मोठे असा आहे. आणि म्हणूनच सर्वव्यापी परमात्मा ब्रह्म विशाल आहे. म्हणजे जे सर्वांना व्यापून राहिले आहे परंतु ज्याला कोणी व्यापू शकत नाही.

दिव्यम् – स्वयंप्रकाशित, प्रकाशघन आहे →
अचिन्त्यरूपम् – अतर्क्य, अज्ञेय
→ भौतिक गुणधर्म आणि ज्ञात गुणवैशिष्ट्ये नसलेला असा तो आहे

अशा या सत्यतत्त्वाची हृदयाच्या गुहेत प्रचीती घेतली जाते

©www.madhaveeraghuveer.com

सर्वत्र व्यापणारा, अनंत कोटि ब्रह्मांड भरून असणारा व त्याच्या बाहेरही, तो अज्ञेय. आपल्या कल्पनादेखील सीमित आहेत त्यामुळे इतक्या व्यापक रूपाची आपण कल्पनादेखील करू शकत नाही म्हणून तो अचिन्त्य आहे.

हा मोठ्यात मोठा असून सूक्ष्मात सूक्ष्म आहे. सूक्ष्म जीवाणूंमध्ये देखील हा आहे.

हा सर्वदूर पसरलेला आहे. मनाची धाव जिथपर्यंत पोहोचू शकेल त्याच्याही पुढे हा आहे. आणि म्हटलं तर सगळ्यात जवळ कोण असेल तर हाच आहे.

इतका जवळ असून, आमच्या कणाकणात भरला असूनही आम्हाला का बरे दिसत/जाणवत नाही? कारण ती दृष्टी आमच्याकडे नाही. मात्र अशा साक्षात्कारी पुरुषांना तो हृदयाच्या गुहेमध्ये सापडतो.

न चक्षुषा गृह्यते नापि वाचा
न अन्यैः देवैः तपसा कर्मणा वा।
ज्ञानप्रसादेन विशुद्धसत्त्वः
ततः तु तं पश्यते निष्कलं ध्यायमानः।

हा अतिसूक्ष्म असल्याने डोळ्यांनी पहाता येत नाही वाणीने त्याचे वर्णन करता येत नाही. तसं म्हटलं तर कोणत्याही इंद्रियाने त्याचे ग्रहण करता येत नाही किंवा तपाचरणाने / कर्मकांडाने ते घडू शकत नाही. ज्ञानप्रसादाने ज्याची बुद्धी शुद्ध झाली आहे व जो नियमित ध्यानसाधना करतो अशा साधकाला खरोखर या अवयवरहित (निष्कल) आत्मतत्त्वाचा साक्षात्कार होऊ शकतो.

© www.madhaveeraghuveer.com

14 SAT AUG 2010 — Priority

Wk 32, 226-139

**August 2010**

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

शब्द हे मनाने अनुभवलेल्या अनुभवांचे प्रतीक असतात. कधी कधी गूढ अनुभवांचे वर्णन करायला सुद्धा शब्द अपुरे पडतात. अशा वेळेला तीव्र ध्यानाच्या अवस्थेतील तरल अनुभव कसे काय वर्णन करता येणार? ∴ आत्मतत्त्व वाणीने वर्णन करता येत नाही.

सत्यतत्त्व जसे इंद्रियांच्या योगे आकलन करून घेता येत नाही. तसेच ते यज्ञयागादि कर्मकांडाने/तपाचरणाने देखील प्राप्त करता येत नाही. हे कसे?

तर मर्त्य मानवांनी अनित्य विनाशी वस्तूंचा उपयोग करून केलेले कर्म अनंत/शाश्वताची प्राप्ती कधीही करून देऊ शकणार नाही.

मातीच्या गोळ्यापासून कधीच सुवर्णाची साखळी बनवता येणार नाही.

परंतु मग जगात सर्वत्र तपाचरण/आचारधर्मांचे पालन याचा आग्रह धरला जातो त्याचा आधार काय? तर साधकांची पूर्वतयारी आहे. या सर्व गोष्टींमुळे साधक आपल्या आंतरिक व्यक्तिमत्वात एकसंध झालेला असतो, शांतचित्त झालेला असतो.

मात्र हे अंतिम साध्य नव्हे. ध्यानसाधना हे साधन तर आत्मसाक्षात्कार हे साध्य आहे. कर्मकांडाने चित्तशुद्धी होईल. तपाचरण, यज्ञयागाला फुटक्या होड्या म्हटले आहे (अदृढाः प्लवाः) ही सर्व साधने ज्ञानाला प्राप्त होण्यासाठी आहेत. त्याने जीवात्मा विशुद्ध होऊन जाईल. ध्यास लागेल परंतु ते तेवढेच!

प्रवचनाने, श्रवणाने, बुद्धीने काही हा आत्मा बघता येत नाही. त्या आत्म्याला योग्य वाटेल त्याच्यापुढेच हा प्रगट होतो.

नायमात्मा प्रवचनेन लभ्यः न मेधया न बहुधा श्रुतेन। यमेवैष वृणुते तेन लभ्यस्तस्यैष आत्मा विवृणुते तनुम् स्वाम्॥

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

त्याची कृपा झाली तरच परमात्म्याचे दर्शन घडू शकते. ही कृपा झाल्याचे पहिले लक्षण म्हणजे शांतभावना जाणे. मन शुद्ध होणे. त्याला जाणण्यासाठी मन शुद्ध हवे स्थिर हवे. मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण. या ब्रह्माला आकार, अवयव नाही. त्यामुळे ध्यानाखेरीज त्याचा ठाव लागणे शक्य नाही.

एषोऽणुरात्मा चेतसा वेदितव्यो
यस्मिन् प्राणः पञ्चधा संविवेश।
प्राणैश्चित्तं सर्वमोतं ~~...~~ प्रजानाम्
यस्मिन् विशुद्धे विभवत्येष आत्मा ॥९॥

ज्या शरीरात प्राणशक्ती पाच प्रकारांनी प्रवेश करून राहिली आहे, अशा शरीरात हा सूक्ष्म आत्मा शुद्ध चित्ताने जाणावा. माणसाचे सर्व चित्त (बुद्धी) सुद्धा प्राणशक्तीने पूर्ण भरलेले आहे. अशा विशुद्ध चित्तात हा आत्मा प्रकाशतो.

स्वतः सान्त असलेली मानवाची मन आणि बुद्धी साधना व ध्यान यांच्या द्वारे अनंत आत्मतत्त्वाची अनुभूति कशी घेऊ शकतात? अशी शंका गोंधळलेल्या पुस्तकी पंडितांच्या मनात येऊ शकते.

ज्याच्याशी तादात्म्य ~~...~~ पावल्यामुळे आपण आपले मूळ स्वरूप विसरलो आहोत, त्या सान्त प्रकृति आवरणाचा एकदा शुद्ध बुद्धीने विवेक केला की बुद्धीने करावयाचे ध्यान संपते. जे शिल्लक रहाते ते आपले दिव्य प्रकाशमान स्वरूप होय.

सूर्य जसा ढगामागून बाजूला जातो तसे आपण एकदा का त्या प्रकृति तादात्म्यापासून दूर झालो की आत्मतत्त्व आपले अस्तित्व प्रस्थापित करत स्वतःच प्रकाशते.

Birthday / Anniversary

© www.madhuraveeraghuveer.com

**16** MON AUG 2010 — Priority

Wk 33, 228-137

August 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

चित्त अंतर्मुख बनले की ते शुद्ध होते व त्याला चैतन्याची जाणीव होते.

स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण या चार देहांची एकूण ब्याऐंशी तत्त्वे आहेत. ही तत्त्वे देहात राहून कार्य करतात. एक-एक तत्त्व जाणून घेऊन ते तत्त्व म्हणजे मी नाही हे कळत जाणे म्हणजे चित्त शुद्ध होणे, असे झाले की खऱ्या 'मी'चे स्वरूप कळते. व तेच ब्रह्माचे ही स्वरूप आहे हे ध्यानात येते.

अज्ञान आणि अहंकार, आसक्ती आणि तिरस्कार हे माणसाचे चित्त दूषित करतात. ते दोष दूर करून चित्त सुप्रसन्न केले की आत्मा स्वतः तिथे प्रकाशतो.

यं यं लोकं मनसा संविभाति
विशुद्धसत्त्वः कामयते यांश्च कामान्।
तं तं लोकं जयते तांश्च कामान्
तस्मात् आत्मज्ञं ह्यर्चयेत् भूतिकामः॥

अंतःकरण पूर्णपणे शुद्ध असणारा ज्या ज्या लोकांचे (पितृलोक, स्वर्लोक इ.) एकाग्रतेने मनात चिंतन करतो आणि ज्या ज्या कामनांची इच्छा बाळगतो, ते ते लोक आणि त्या त्या कामना तो प्राप्त करतो. ∴ ऐश्वर्याची इच्छा करणाऱ्याने आत्मसाक्षात्कारी लोकांची पूजा करावी.

मन म्हणजेच मनुष्य
असे मन तसा मानव

असे ऋषींनी पूर्वीच सांगून ठेवले आहे. आपण एकाग्र भक्तीने परिपूर्ण मनाचा पणाला लावून एखादी इच्छा केली तर ती अनेकदा पूर्ण होते. पण ती इच्छा तीव्र हवी, त्यासाठी तळमळ हवी.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

पूर्णपणे वृद्धिंगत झालेला साधक केवळ भक्तिमत्ता मधील सर्वश्रेष्ठ पूर्णतेला पोहोचू शकतो.

भाविक —— ईश्वरकृपा म्हणतात

वेदांती —— आत्मशक्ती

योगाभ्यासी —— कुंडलिनीचे वैभव

असा पोहोचलेला महात्मा सर्वांवर अनुग्रह करतो आणि सर्वांमध्ये एक व एकामध्ये सर्व अशा धन्यतेने जीवन जगत असतो.

ज्याने परब्रह्माचा अनुभव घेतला आहे तो जाणतो की तोच मी आहे. परब्रह्माच्या ज्या शक्ती आहेत त्या त्याच्या असतात.

अशा लोकांच्या मनात लौकिक, क्षुद्र इच्छा नसतात. अशाश्वत गोष्टींमध्ये त्यांना रस नसतो, पण लौकिक सुखासाठी त्यांच्या मनात काही इच्छा स्फुरतात. म्हणून तर ब्रह्मस्वरूप झालेल्या ज्ञानेश्वरांनी पसायदान मागितले. ही विश्वकल्याणाची कामना आहे. लोकांच्या मनात जे संकल्प उठतात ते सत्य करण्याची जबाबदारी त्या परमात्म्याचीच आहे तो ती पार पाडतो.

अशा संतांकडे प्रापंचिक लोक आपल्या ऐहिक इच्छा पूर्ण करण्यासाठी जातात. आणि करुणासागर संत त्यांच्या इच्छा पूर्णही करतात. पण मनातून दुःखी ही होतात. समर्थ म्हणतात — मागो निःस्पृहता मोठी तुझ्या पायी!

गोंदवलेकर महाराज तर म्हणतात,

आमचे दुकान थाटले आहे केशर - कस्तुरीचे पण गिऱ्हाईक येते ते सारे हिंगा मिरचीचे!

खरा जो साधक असतो तो ईश्वराचे ऐश्वर्य अनुभवू इच्छितो (ईश्वरस्य भावः ऐश्वर्यः) आणि ही असे महात्मे आहेत. ते उदारपणे द्यायला तयार आहेत आपली मात्र तशी इच्छा व तयारी हवी.

Birthday / Anniversary

© www.madhavbhaveraghuveer.com

5 April 2017

॥श्री॥

मुण्डक - ३ खण्ड - २

स वेद एतत् परमं ब्रह्म धाम
यत्र विश्वं निहितं भाति शुभ्रम्।
उपासते पुरुषं ये ह्यकामाः
ते शुक्रमेतद् अतिवर्तन्ति धीराः॥१॥

ज्या ठिकाणी हे स्वच्छ प्रकाशणारे विश्व स्थित आहे, त्या तेजस्वी परब्रह्माला तो (साक्षात्कारी पुरुष) जाणतो. जे निरिच्छ लोक या पुरुषाची सेवा करतात, ते ज्ञानी लोक या पुनर्जन्माच्या अवस्थेपलीकडे जातात.

मागील मंत्रामध्ये महात्मा साक्षात्कारी पुरुषांची सेवा केल्याने, साधकांच्या लौकिक कामनाही पूर्ण होतात असे आपण पाहिले परंतु ज्यांना ऐहिक कामनाही उरल्या नसतात त्यांना काय लाभ होतो ते यात सांगितले आहे.

परमश्रेष्ठ शुभ्र अशा ब्रह्मधामाच्या ठिकाणी हे विश्व स्थिर प्रतीत होते. हे सर्व श्रेष्ठ धाम आहे, याच्या वर काही नाही. हे शुभ्र आहे. निरंजन आहे. निर्मळ आहे.

यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम॥

शुभ्र रंगाचे जेव्हा पृथक्करण होते तेव्हा सात रंग दिसतात. पुन्हा त्यांचे एकत्रीकरण Synthesis केले की शुभ्र रंग दिसतो. परब्रह्माचे तसेच आहे. ते वेगवेगळी रूपे घेते. भेद दिसतो परंतु मूळ अभेदच आहे.

अभेद म्हणजे ज्ञान आणि भेद म्हणजे अज्ञान। आत्मज्ञानी लोकांना भेदामध्ये देखील अभेद दिसत असतो.

अविभक्तं विभक्तेषु

© www.madhaveeraghuveer.com

संतांना दागिन्यांमध्ये सोने दिसते. लाटांमध्ये पाणी दिसते. ते या भेदाने आंधळून जात नाहीं किंवा फसतही नाहीत. आणि हे अभेदत्व पहाण्यासाठी मुद्दाम भेद (विश्व) दूर सारण्याचीही आवश्यकता नाही.

अशा संतांना सामान्यांप्रमाणे कोणत्याही कामना नसतात. त्यांनी ज्या परमपुरुषाचा ध्यास घेतलेला असतो तो त्यांना प्राप्त होतो.

इथे शुभ्र व शुक्र असे दोन शब्द वापरले आहेत. शुभ्र म्हणजे निर्मळ तर शुक्र म्हणजे ओजस्वी, वीर्ययुक्त. शरीरातील सर्वोच्च तत्व! ज्यापासून पुनर्निर्मिती होते. परंतु असे थोर आत्मज्ञानी महात्मे याच्याही पलीकडे जातात. जन्ममृत्युच्या चक्रातून सुटतात वासना गेल्या, अहं गेला, पापपुण्याचे लेप गेले की पुन्हा जन्म घेण्याचे प्रयोजनच उरत नाही. देह ठेवताना जशा वासना असतात तसा जन्म प्राप्त होतो. परंतु ज्याला वासना नाहीत असा मनुष्य जीवन्मुक्त होतो. त्यांना सर्वठायी केवळ ब्रह्माचेच दर्शन घडते.

कामान सः कामयते मन्यमानः
स कामभिर्जायते तत्र तत्र ।
पर्याप्तकामस्य कृतात्मनस्तु
इहैव सर्वे प्रविलीयन्ति कामाः ॥२॥

जो पुरुष कामनांच्या इच्छा बाळगतो आणि त्यांचेच चिंतन करीत राहतो तो त्या विषयांमुळे तेथे तेथे त्या त्या योनीत जन्म घेतो. परंतु ज्याच्या इच्छा पूर्ण झाल्या आहेत आणि आत्मानुभूतीने युक्त जो कृतकृत्य झाला आहे अशा पुरुषाच्या कामना या लोकीच लय पावतात.

© www.madhaveeraghuveer.com

**August 2010**

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

"जसा तुम्ही विचार करता तसे तुम्ही बनता" हा भारतीय तत्त्वज्ञानांनी स्वीकारलेला अविवाद्य नियम आहे. विचार ही आपल्यातील सृजनशील ऊर्मीची अभिव्यक्ती असते.

आत्मसाक्षात्कार म्हणजे आपल्यातील अज्ञानाच्या प्रत्येक लवलेशाचा नाश करणे होय. जो असे अज्ञान पूर्णपणे टाकून देतो त्याच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारच्या कामना उरत नाहीत. त्यालाच पर्याप्तकाम असा शब्द वापरला आहे. — पूर्णकाम, आप्तकाम मात्र ही निरिच्छता मनापासून असते. केवळ 'कोल्ह्याला द्राक्षे आंबट' या प्रकारची नसते. तृप्तकाम झालेल्या महात्म्याच्या मनात कोणत्याच वृत्ती उठत नाहीत. वासना येत नाहीत. त्यामुळे त्याच्या सर्व कामना इथेच विलीन होऊन जातात. अशी निर्वृत्ति अवस्था प्राप्त झाली तरच कदाचित परमात्मदर्शन शक्य आहे.

नायमात्मा प्रवचनेन लभ्यो
न मेधया न बहुधा श्रुतेन।
यमेवैष वृणुते तेन लभ्यः
तस्यैष आत्मा विवृणुते तनूं स्वाम्॥२३॥
कठ. १.२.२३

हा आत्मा शास्त्राच्या केवळ अध्यापनाने प्राप्त होण्यासारखा नाही, किंवा केवळ बुद्धीने म्हणजे 'श्रुति' ग्रंथ स्मरणात ठेवल्याने, अनेक शास्त्रांचे श्रवण केल्याने ही होत नाही. जो ज्ञानी पुरुष त्याला प्राप्त करून घेण्याची उत्कट इच्छा बाळगतो त्याच्याकडूनच केवळ तो प्राप्त केला जातो आणि त्यालाच हा आत्मा आपले सत्य स्वरूप प्रगट करतो.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

विज्ञानपूर्ण प्रवचने करणाऱ्या विद्वानालादेखील त्या आत्मतत्त्वाची प्रचीती येत नाही. त्रिवेदी/चतुर्वेदी म्हणजे वेद मुखोद्गत असणाऱ्यांनाही त्याची अनुभूति येत नाही. कोणताही महात्मा-गुरु आपल्या शिष्याला ईश्वराची अनुभूति स्वाधीन करू शकत नाही.

थोडक्यात प्रदीर्घ वाचन, सखोल अध्ययन व परिपूर्ण अध्यापन यापैकी कोणताही मार्ग परमात्म्याची अनुभूति करून देऊ शकत नाही. मात्र ज्याला त्याची आंतरिक ओढ लागली असेल त्यालाच तो प्राप्त होतो.

यम व एष: या दोन्ही शब्दांचे अर्थ भिन्न होऊ शकतात. अद्वैत ⟶ जो 'आत्मा' मिळवण्यासाठी ही साधक आकांक्षा बाळगतो.

द्वैती ⟶ ज्याची निवड ईश्वरच करील असा साधक। हा आत्मा प्रसन्न होऊन ज्याची निवड करतो त्यालाच तो आपले स्वरूप उघडे करून दाखवतो त्यालाच त्या परमात्म्याचे दर्शन होते. अनुभव येतो. अस्तित्व जाणवते.

आपले सर्व संत फारसे शिकलेले नव्हते. काही तर निरक्षर होते. त्यांच्याजवळ लौकिकदृष्ट्या मेधा नाही, प्रतिभा नाही, बहुश्रुतता नाही. पण प्रेम आहे, ध्यास, तळमळ आहे अशांना त्याचा साक्षात्कार घडतो.

हे प्रेम, हा ध्यास निर्माण होण्यासाठी सत्संग हवा.

नायमात्मा बलहीनेन लभ्यो
न च प्रमादात् तपसो वा अपि अलिङ्गात्।
एतैरुपायैर्यतते यस्तु विद्वान्
तस्यैष आत्मा विशते ब्रह्मधाम॥

हा परमात्मा बलहीनाला मिळत नाही. साधनेचे बळ हवे. मानसिक बळ हवे व आत्मिक बळ हवे.

Birthday / Anniversary

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

त्याचप्रमाणे श्रद्धा नसणाऱ्यालाही तो प्राप्त होत नाही. किंवा बाह्य वेषासारखी कोणतीही खूण (लिंग) न ठेवता अप्रबुद्धपणे तप करणाऱ्यांकडूनही तो प्राप्त केला जात नाही. परंतु जेव्हा विद्वान याच उपायांनी परंतु सुबुद्धपणे प्रयत्न करतो तेव्हा, त्याचा हा आत्मा ब्रह्माशी एकरूपता प्राप्त करतो.

इथे श्रुति सर्वसाधारण गैरसमज दूर करते आहे. साधक म्हणजे काही समाजाला निरुपयोगी व्यक्ती नाही. किंवा जीवनात अपयशी ठरलेली निराश व्यक्ती नाही. बलहीनचा अर्थ दुबळा (म्हणजे श्रद्धेच्या बाबतीत) घ्यावा.

अध्यात्मात आत्मक्लेश सुद्धा फारसे उपयोगी ठरत नाहीत. अध्यात्माची तात्पुरती ऊब फारशी परिणामकारक ठरत नाही. उगीच जागरणे, तीर्थयात्रा, अतिरेकी कसरती करून सत्यतत्त्वाचा किल्ला हस्तगत करता येत नाही. इथे लिंग म्हणजे लक्षण, प्रतीक, खूण असा आहे. भगवी वस्त्रे, कमंडलु, मुंडन वापरण्याची चटई किंवा मोड्यांचा प्रकार ही बाह्य प्रतीके असली तरी ती आवश्यक आहेत असे नाही. इथे लिंग या शब्दाचा अर्थ त्यागाची बाह्य चिन्हे असा घ्यायचा आहे.

खरे आत्मिक बळ मिळवण्यासाठी आतुरतच्छु व्हायला हवे, वृत्ति शांत हव्यात. कुठेही प्रमाद नको. संपूर्ण अवधान म्हणजे सावधानता हवी. पूर्ण एकाग्रता हवी.

ज्याचा अहं गळून गेला आहे. नित्य सावधानता आहे. सत्त्वगुण दृढ झाला आहे अशा साधकाच्या प्रयत्नांना यश मिळते. तो ब्रह्मधामी प्रवेश करतो. परब्रह्मात लीन होतो.

Birthday / Anniversary

सम्प्राप्य एनम् ऋषयः ज्ञानतृप्ताः
कृतात्मानः वीतरागाः प्रशान्ताः।
ते सर्वगं सर्वतः प्राप्य धीराः
युक्तात्मानः सर्वम् एव आविशन्ति॥५॥

परमात्म्याला संपूर्णपणे प्राप्त केल्यावर ऋषिगण, ज्ञानतृप्त, कृतकृत्य, कामनारहित व अत्यंत शांत चित्त होतात आणि आत्मतत्त्व सर्व बाजूंनी प्राप्त केल्यावर आत्मतत्त्वाशी युक्त झालेले ते विद्वान लोक सर्व गोष्टीत प्रविष्ट होतात.

आत्म्याचे दर्शन झालेले ऋषी ज्ञानाने तृप्त, पूर्णता पावलेले, निरासक्त आणि अत्यंत शांत बनतात. सर्वगामी ब्रह्माला सर्व बाजूंनी कवटाळल्याने ते विवेकी पुरुष शेवटी त्याच्यातच विलीन होतात.

या श्लोकात ब्रह्मज्ञानी पुरुषाची प्रधान लक्षणे सांगितली आहेत. कोणत्याही अवस्थेमध्ये न भंगणारे समाधान हे त्याचे मुख्य लक्षण समजावे. मग त्याला ज्ञानतृप्त, वीतराग, प्रशांत काहीही म्हणा.

© www.madhaveeraghuveer.com

August 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

वेदान्तविज्ञानसुनिश्चितार्थाः
सन्न्यासयोगात् यतयः शुद्धसत्त्वाः।
ते ब्रह्मलोकेषु परान्तकाले
परामृताः परिमुच्यन्ति सर्वे ॥६॥

वेदांताचा विषय जो विज्ञान (आत्मज्ञान) त्याचा खरा गर्भितार्थ ज्यांना निःसंदिग्धपणे समजला आहे असे आणि संन्यासयोगाच्या आचरणाने ज्यांची अंतःकरणे शुद्ध झाली आहेत असे सगळे यती ब्रह्मलोकाप्रत पोहोचतात आणि तिथे अंतकाळी अमृत मिळवून मुक्त होतात.

सर्वकर्मपरित्याग म्हणजे वासनेचा संपूर्ण त्याग।

☆ वासना तृप्त करण्याचा मार्ग शोधणे — हे विज्ञानाचे काम तर
वासना नाहीशी " " " हे अध्यात्माचे " आहे
पहिल्यामध्ये माणूसपण तर दुसऱ्यामध्ये देवपण आहे
माणूस म्हणून जन्माला येऊन देवपणात जाणे हीच माणसाची खरी करामत होय.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

8 am

गता: कला: पञ्चदश प्रतिष्ठा
देवाश्च सर्वे प्रतिदेवतासु ।
कर्माणि विज्ञानमयश्च आत्मा
परे व्यये सर्व एकीभवन्ति ॥ ७॥

10

समाधीच्या वेळी प्राणादी पंधरा कला आपापल्या आश्रयस्थान अशा भूतांमध्ये प्रवेश करतात. सर्व इंद्रिये त्यांच्या त्यांच्या अधिष्ठात्री देवतांमध्ये प्रतिष्ठित होतात. विज्ञानमय आत्मा आणि कर्मे ही सर्व अविनाशी अशा परब्रह्माच्या ठिकाणी एकरूप होतात.

11

12

1 pm

2

3

4

5

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

Priority

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **August 2010** | | | | | | |
| M | T | W | T | F | S | S |
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

8 am यथा नद्यः स्यन्दमानाः समुद्रेऽस्तं
गच्छन्ति नामरूपे विहाय।
9 तथा विद्वान् नामरूपात् विमुक्तः
परात्परं पुरुषमुपैति दिव्यम्॥ ८॥

10 ज्याप्रमाणे वाहत्या नद्या, त्यांचे विशिष्ट नाम
11 आणि रूप सोडून सागरात विलीन होतात
त्याचप्रमाणे ज्ञानी लोक आपल्या नामरूपाशी
12 असलेल्या सर्व तादात्म्यापासून मुक्त होऊन
श्रेष्ठातील श्रेष्ठ अशा शाश्वत दिव्यत्वाप्रत जातात.

1 pm जलचक्राच्या ओघात महासागर — ढग — पाऊस — ओहोळ — नदी या नावाने ओळखले जाते. नदी ज्या 2 भागातून वाहत जाते त्या प्रदेशाप्रमाणे पाण्यातील खनिज द्रव्ये रंग बदलत जातात. प्रत्येक नदीला स्वतंत्र 3 व्यक्तिमत्व असते. अलकनंदा खळाळत जाते तर मंदाकिनी संथ वाहते, कृष्णा काही ठिकाणी उग्र तर 4 काही ठिकाणी सौम्य असते. ब्रह्मपुत्रा-आसामचे अश्रू!

परंतु एकदा समुद्राला मिळाल्या की त्या सागराच्या 5 एकसंध अशा विस्तृतपणाशी एकरूप होतात.

तसेच जोपर्यंत साधक अलगपणाची भावना 6 बाळगतो आणि भोवतालच्या प्रकृति आवरणाशी मिथ्या तादात्म्य ठेवतो तोपर्यंत त्याच्यामध्ये अहंकार केंद्रित 7 जीवभाव टिकून राहतो. असा आत्मज्ञान न झालेला आपले वेगळेपण टिकवून ठेवतो म्हणून त्याला पुनर्जन्म घ्यावा लागतो.

परंतु आत्मज्ञानी माणूस मात्र नामरूपातून मुक्त होऊन त्या दिव्य पुरुषाला प्राप्त होतो.

Birthday / Anniversary

©www.madhaveeraguruveer.com

September 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

*Priority*

FRI
AUG
2010
27

Wk 34, 239-126

8 am

स यो ह वै तत् परमं ब्रह्म वेद
ब्रह्मैव भवति न अस्य ब्रह्मवित् कुले भवति।
9
तरति शोकं तरति पाप्मानं
गुहाग्रंथिभ्यो विमुक्तोऽमृतो भवति॥१॥

10

जो कोणी ते परब्रह्म खरोखरी जाणतो तो स्वतःच
11
ब्रह्म होतो. त्याच्या कुळात ब्रह्म न जाणणारा असा
कोणीही कधीही जन्माला येत नाही. तो दुःख व पाप
12
दोन्ही तरून जातो आणि अंतःकरणातील अविद्येच्या
ग्रंथिपासून तो मुक्त होतो व अमर होतो.

1 pm

2

3

4

5

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

| August 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

तद एतद् ऋचाभ्युक्तम्

क्रियावन्तः श्रोत्रिया ब्रह्मनिष्ठाः
स्वयं जुह्वत एकर्षिं श्रद्धयन्तः।
तेषामेवैतां ब्रह्मविद्यां वदेत
शिरोव्रतं विधिवत् यैस्तु चीर्णम् ॥१०॥

ती ही ब्रह्मविद्या ऋचांमध्ये सांगितली आहे. जे कोणी निष्काम भावनेने यज्ञकर्म करणारे आहेत. जे वेदांच्या अभ्यासात पारंगत आहेत. जे ब्रह्माचे चिंतन सातत्याने करतात, जे श्रद्धावान आहेत. जे एकर्षि नावाच्या अग्नित स्वतः विधिवत् हवन करतात. आणि ज्यांच्याकडून डोक्यावरून अग्नि नेण्याचे व्रत विधियुक्त पद्धतीने आचरले जाते, त्यांनाच केवळ ही ब्रह्मविद्या सांगावी.

© www.madhaveeraghuveer.com

Birthday / Anniversary

तद् एतत् सत्यं ऋषिः आङ्गिरा: पुरा उवाच
न एतत् अचीर्णव्रत: अधीते
नम: परमऋषिभ्य: नम: परमऋषिभ्य: ॥ ११ ॥

हेच ते सत्यतत्त्व अंगिरस ऋषींनी फार पुरातन काळी शौनकादि आपल्या शिष्यांना सांगितले. कोणतेही व्रत न आचरणाऱ्याने ह्याचे अध्ययन करू नये.

लोभपूर्ण, अत्यंत तळमळीचे, पूर्ण ज्ञानी, परंतु अतृप्त तृष्णेचे जीवन व्यतीत केल्यानंतरच शिष्य गुरूंकडे पोहोचतो. तसेच शौनक ऋषी गुरु अंगिरसांकडे गेले आणि विचारते झाले —

काय एकच जाणले असता सर्व जाणल्यासारखे होते? अंगिरस ब्रह्मविद् होते. त्यांना ही विद्या परंपरेने प्राप्त झाली होती. यापूर्वी अनेक शिष्यांनी ही विद्या प्राप्त करून घेतली होती. परंतु यासाठी एक अट आहे.

जो व्रतांचे आचरण करत नाही त्याला ही विद्या देऊ नये. अपात्र व्यक्तीला विद्या दिली तर त्याचा दुरुपयोग होण्याची शक्यता असते. अयोग्य व्यक्तीच्या हाती विद्या गेली तर ती विद्या अनर्थकारी होते.

अश्वत्थामा —— उत्तरेच्या गर्भावर ब्रह्मास्त्र सोडले.

शौनक शाश्वत आणि अनंत, दिव्य-कल्याणकारक, परिपूर्ण-समाधानकारक अशा जीवनाच्या शोधात अंगिरस गुरूंच्या आश्रमात गेला. गुरूने त्याने विचारलेल्या प्रश्नांना एकच उत्तर दिले. तत् त्वम् असि।

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com